# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ०८ डिसेंबर, २०१६ / अग्रहायण १७, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३) कृषि आणि फलोत्पादन मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८१**

---

### शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचन अनुदानाची प्रलंबित रक्कम अदा करण्याबाबत

**(१) * २५१८६ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक १९६३६ ला दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१३ पासुन शेतकऱ्यांसाठी कृषि सिंचन योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचन योजना राबवण्यात येत असून सन २०१३ ते २०१६ या कालावधीत २,०२,५६४ शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणारे अनुदान सन २०१३ पासुन प्रलंबित असुन रुपये ४३२ कोटी शेतकऱ्यांना देणे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना सुक्ष्म सिंचन अनुदानाची प्रलंबित रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत सन २०१३-२०१४ ते सन २०१५-२०१६ या कालावधीत २,६३,७०१ शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे.
(२) सन २०१३-१४ या वर्षातील रूपये १२८.९३ कोटी व सन २०१४-१५ या वर्षातील पूर्वसंमती दिलेले रूपये ५६.२९ कोटी असे एकूण रूपये १८५.२२ कोटी एवढ्या रकमेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत.
(३) निधी उपलब्धतेनुसार शेतकऱ्यांना अनुदान देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अलिबाग, पेण, धरमतर ते वडखळ (जि.रायगड) येथील**
**रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(२) * २३६५८ श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.जयंत पाटील, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अलिबाग, पेण, धरमतर ते वडखळ (जि.रायगड) येथील रस्त्यांची पावसामुळे दुरवस्था झाली असून रस्त्यात मोठे खड्डे पडल्याने वाहतूकीस मोठ्या प्रमाणात त्रास होत असल्याने स्थानिक नागरिकांनी तसेच, लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग तसेच शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून रस्ते दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

प्रश्नांकित रस्त्याबाबत स्थानिक नागरिक संघटना ह्यांची ३ निवेदने प्राप्त झालेली आहेत.

(२) वडखळ ते अलिबाग ह्या २२.२० कि.मी. राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६-अ पैकी ९.२० कि.मी. लांबीमध्ये नूतनीकरणाचे काम प्रगतीत असून मार्च, २०१७ पूर्वी पूर्ण होणे अपेक्षित आहे. उर्वरित १३.०० कि.मी. लांबीमध्ये डांबरमिश्रीत खड्डे भरण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गावरील पोलादपूर व पनवेल येथील पुलांची दुरूस्ती व पथदिव्यांची सोय करण्याबाबत

**(३) * २४३९३ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील पोलादपूर व पनवेल येथील नद्या व कालव्यांवर ५० ते १०० वर्षापूर्वी बांधलेले १० पूल धोकादायक झाले असून सदर पुलांची दुरूस्ती व पुलावर गावाजवळ पथदिव्यांची सोय करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरीकांनी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर महामार्गावरील नदी व कालव्यांवरील पुलांची दुरूस्ती व पथदिव्यांची सोय करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाची कि.मी. ०/०० ते १५/५०० ह्या १५.५० कि.मी. लांबी पनवेल तालुक्यामध्ये आणि कि.मी. १०८/४५० ते १५४/४०० ही ४५.९७ कि.मी. लांबी पोलादपूर तालुक्यात असून ह्या लांबीत दोन पूल आहेत.

या महामार्गावर पनवेल तालुक्याच्या हद्दीत कि.मी. १५.५० मध्ये खारपाडा पूल सुस्थितीत असून तेथे पथदिव्यांची सोय उपलब्ध असल्याचे, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

तसेच पोलादपूर तालुक्यात कि.मी. १४२/४०० वर सडवली नाल्यावर लहान पूल असून सदरील पूल वाहतुकींसाठी सुरक्षित असून सद्या तेथे पथदिव्यांची सोय नाही. तसेच या पूलाच्या मजबूतीकरणाचे अंदाजपत्रक केंद्र शासनास सादर करण्यात आले आहे. इंदापूर ते झाराप हया भागातील महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या प्रकल्पात सडवली नाल्यावर नवीन पुलाच्या बांधकामासह पथदिव्यांची तरतूद करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाड (जि.रायगड) तालुक्यातील सावित्री नदीवरील पुलाच्या दुर्घटनेबाबत**

**(४) * २३५३३ श्री.जयंत पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यातील सावित्री नदीवरील पूल अतिवृष्टीमुळे दिनांक २ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास कोसळला असून सदर दुर्घटनेमध्ये ४४ पेक्षा जास्त व्यक्तींना प्राण गमवावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाच्या दुर्घटनेपूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून बांधकाम लेखा परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्यात आले असून सदर तपासणीमध्ये पूल वाहतुकीस योग्य आहे असा अहवाल देण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असताना ही दुर्घटना घडल्याने संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील उड्डाण पुलांचे बांधकाम लेखा परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करुन पुलांचे अपुर्ण बांधकाम पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदरील दुर्घटनेमध्ये ३९ व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या असून १ व्यक्ती बेपत्ता आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर दुर्घटनेची चौकशी करणेसाठी शासन निर्णय क्र.न्याप्र २०१६/प्र.क्र.२५८/रा.म.१, दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ अनुसार मा.श्री.एस.के.शाह, सेवा निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय, मुंबई यांची एक सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील १७ पुलांपैकी १० पुलांना पर्यायी चौपदरी पुलाचे बांधकाम प्रगतीत असून ३ पुलांना पर्यायी पुलांच्या बांधकामासाठी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत. उर्वरीत ४ पुलांना पर्यायी पूल बांधण्यासाठी निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.

तसेच अस्तित्वातील पुलांच्या दुरुस्तीसाठी रुपये ९ कोटी किंमतीचे अंदाजपत्रके रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांना मंजुरीसाठी सादर करण्यात आलेली असून छाननीस्तरावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील दूध पुरवठा संघामधील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(५) * २५९३१ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील सहकारी दुध उत्पादक व पुरवठा संघामध्ये सन २०१० मध्ये झालेल्या गैरव्यवहारामुळे बंद पडलेल्या दूध पुरवठा संघामध्ये कार्यरत असलेल्या ६४ कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुम तालुका सहकारी दुध उत्पादक व पुरवठा संघ कर्मचारी संघटना, भूम यांनी उपरोक्त गैरव्यवहाराची चौकशी करावी व संघ बंद झाल्यामुळे संघाकडे राहिलेला आजपर्यतचा पगार तसेच सेवानिवृत्ती पर्यंतचा पगार व गॅज्युएटी, प्रा.फंड, रजेचा पगार इत्यादी रक्कमा मिळाव्यात आदि मागण्यांकरिता माहे सप्टेंबर, २०१६ पासून उपविभागीय अधिकारी, भूम कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) भूम तालुका सहकारी दुध उत्पादक व पुरवठा संघ माहे फेब्रुवारी, २०१० पासून बंद अवस्थेत असून त्यावेळी ६४ कर्मचारी कार्यरत होते.
(२) संघाचे कर्मचारी दिनांक १६ सप्टेंबर, २०१६ पासून उपविभागीय अधिकारी, भूम यांच्या कार्यालयासमोर त्यांच्या मागण्यांसाठी उपोषणास बसले होते. त्यांच्या मागण्यांबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), उस्मानाबाद यांनी दिल्यानंतर सदर उपोषण दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता मागे घेतले आहे.
(३) व (४) भूम तालुका सहकारी दुध उत्पादक व पुरवठा संघाचे दिनांक १ एप्रिल, २००९ ते ७ मार्च, २०१४ या कालावधीतील वैधानिक लेखापरिक्षण करण्यात आले असून लेखापरिक्षण अहवालही प्राप्त झालेला आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ८९ (४) अन्वये सदर संघाच्या सर्व दावेदार व धनको यांना त्यांचे दावे दाखल करण्यासाठी दिनांक १८ जुलै, २०१६ ते १७ सप्टेंबर, २०१६ पर्यंत वैधानिक अवधी देण्यात आला होता. त्यानुसार संघाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांचे वेतन विषयक दावे अवसायकांकडे दाखले केले आहेत. प्राप्त दाव्यांनुसार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०५ व सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतूदीनुसार कर्मचाऱ्यांचे थकीत वेतन अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**महाड येथील सावित्री नदीवरील पुल कोसळून झालेल्या दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना मदत देण्याबाबत**

**(६) * २४९०६ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड येथील सावित्री नदीवरील पुल कोसळून झालेल्या दुर्घटनेतील बेपत्ता व्यक्तींचा शोध न लागल्यास त्यांना मृत घोषित करुन मृतांच्या वारसांना शासनाने घोषित केलेली सर्वप्रकारची मदत देण्यात येणार असल्याबाबतची घोषणा मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांनी दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी पत्रकार परिषदेमध्ये दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेस दोन महिन्यांचा कालावधी होऊनही मृतांच्या व बेपत्ता असलेल्या व्यक्तींच्या वारसांना मदत देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार व निकषानुसार मृतांच्या व बेपत्ता असलेल्या व्यक्तींच्या वारसांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा (जि.रायगड) महामार्गावरील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(७) * २४७१८ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा (जि.रायगड) महामार्गावरील खड्डयांमुळे रस्त्यांची दुरवस्था झाली असल्याने प्रवाश्यांना त्रास होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामार्गाकडे मागील १० वर्षापासून शासनाने दुर्लक्ष केल्याने महामार्गाची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार महामार्गावरील खड्डे बुजवून त्याचे डांबरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाचा १६१ कि.मी. भाग रायगड जिल्हयात आहे. त्यापैकी मुख्यत्वे पनवेल ते इंदापूर ह्या ८४ कि.मी. लांबीमध्ये रस्त्याचा पृष्ठभाग काही प्रमाणात खराब आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे असलेल्या पनवेल ते इंदापूर ह्या ८४.०० कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम खाजगीकरणामधून मे.सुप्रिम पनवेल इंदापूर टोलवेज प्रा.लि. या सवलतकारामार्फत दिनांक १९ डिसेंबर, २०११ पासून प्रगतीत असून कर्नाळा पक्षी अभयारण्य क्षेत्रामधील महामार्ग रुंदीकरणासाठी पर्यावरण व वन विभागाची मंजुरी, जलवाहिन्यांचे स्थलांतर तसेच मौ.काराव, नागोठणे व कोलेटी येथील भूसंपादन या बाबींना विलंब झाल्याने तसेच, उद्योजकाकडून दिरंगाई झाल्याने कामास विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे,

सद्यस्थितीत शासनाच्या सहकार्याने सर्व बाबी मार्गी लागल्या असून प्रकल्प पुन:जिवीत करण्यासाठी केंद्र शासनाकडून प्रकल्पाला निधी (one time fund infusion) उपलब्ध करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

गणेशोत्सवाच्या कालावधीत प्रकल्पाच्या लांबीत रस्त्याची देखभाल व दुरुस्ती सवलतकाराच्या जबाबदारीवर त्रयस्थ कंत्राटदारांकडून करुन घेण्यात आली होती. त्यानंतर दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ च्या पावसानंतर मुख्यत्वे पेण व वडखळ या भागात रस्त्याचा पृष्ठभागाची हानी झाली असून त्याठिकाणांची दुरुस्ती कंत्राटदाराच्या जबाबदारीवर करण्यात येत आहे.

पनवेल इंदापूर लांबीतील चौपदरीकरणाचे काम मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

-----------------

**मुंबई शहरातील रस्ते, वाहतूक आणि गाड्या पार्किंगच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(८) * २४७९३ श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील रस्ते, वाहतूक आणि गाड्या पार्किंगच्या समस्या सोडविण्यासाठी मुंबई शहरातील उड्डाणपुलाखालील जागा पार्किंगसाठी देण्याबाबत शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील उड्डाणपुलाखालील जागा वाहनांना पार्किंगसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.१००/२०१५ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक ८ फेब्रुवारी, २०१६ रोजी उड्डाणपुलाखालील पार्किंग हटविण्याचे अंतरिम आदेश दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून आवश्यक कार्यवाही करण्यात येत असून, याकरीता महामंडळास सहकार्य करण्याच्या सूचना गृह विभागाने दिनांक १४ जुलै, २०१६ च्या पत्रान्वये पोलिसांना दिल्या आहेत.

दरम्यान प्रश्नाधीन विषयाबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. १८/२०१४ मध्ये मा.न्यायालयाने दिनांक २७ सप्टेंबर, २०१६ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशात, सर्व संबंधित विभागांनी परस्पर सहकार्याने धोरणात्मक निर्णय घ्यावा असे निर्देश दिले आहेत. सदर निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## नागपूर मध्यवर्ती कारागृहातील प्रतिक्षालय कक्षाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

**(९) * २५२१८ प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मध्यवर्ती कारागृहात कैद्याना भेटण्याकरीता येणाऱ्या नातेवाईकांसाठी नविन प्रतिक्षालय कक्षाच्या बांधकामाकरीता रूपये २२ लाख निधी मंजूर करण्यात येवूनही संबंधित कंत्राटदाराने नविन प्रतिक्षालयाचे बांधकाम न करता जुन्याच प्रतिक्षालयाला डागडूजी व दुरुस्ती करुन गैरव्यवहार केल्याचे दिनांक २८ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित कंत्राटदारावर व अभियंत्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

या विषयाबाबत श्री.बंटी शेळके, शहर अध्यक्ष, इंडियन युथ काँग्रेस, नागपूर यांनी दिनांक २९ जुलै, २०१६ रोजी मुख्य अभियंता, सा.बां.प्रा. विभाग, नागपूर यांना तक्रार सादर केलेली आहे.

(२) उपरोक्त प्रकरणी मुख्य अभियंता, सा.बां.प्रा. विभाग, नागपूर यांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०१६ च्या पत्रान्वये अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नागपूर यांना चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तथापि, काम तक्रार केल्याच्या दिनांकास नुकतेच सुरु झालेले असल्याने व या कामाचे त्यावेळी कुठलेही प्रदान झालेले नसल्याने त्यात गैरव्यवहार होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

सदरहू काम प्रगतीत असून उपभोक्ता विभागाच्या मागणीनुसार पूर्ण करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील नवबौध्द शेतकऱ्यांसाठी असणाऱ्या विशेष घटक योजनेचा निधी खर्च न केल्याबाबत**

**(१०) * २४६२८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीमधील नवबौध्द शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी कृषि विभागाकडून अनुसूचित जाती उपाययोजनेसाठी (विशेष घटक योजना) या आर्थिक वर्षात सुमारे रूपये १९६ कोटी ३४ लक्ष ३१ हजार ची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी माहे नोव्हेंबर, २०१६ अखेर किती रक्कम कोणकोणत्या योजनांकरीता खर्च करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, अत्यल्प प्रमाणात खर्च करण्यात आल्याची कारणे काय आहेत, ही रक्कम पूर्ण खर्च करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) विशेष घटक योजनेंतर्गत खालील १४ घटक राबविण्यात येतात.

जमीन सुधारणा, निविष्ठा वाटप, पीक संरक्षण उपकरणे / सुधारित शेती अवजारे, बैलजोडी, बैलगाडी, जुनी विहिर दुरूस्ती, नवीन विहिर, इनवेल बोअरिंग, पाईप लाईन, पंपसंच, शेततळे, परसबाग, ताडपत्री, सुक्ष्म सिंचन संच.

दिनांक २२ नोव्हेंबर, २०१६ अखेर रुपये १५.११ कोटी एवढा प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

(३) लाभार्थी निवड करणे, लाभार्थी निवड झाल्यानंतर मागणीनुसार साहित्यासाठी पुरवठा आदेश देणे व साहित्याचा पुरवठा करणे या प्रक्रियेसाठी काही कालावधी लागतो. त्याचप्रमाणे योजनेत सर्वसाधारणपणे ३० टक्के खर्च नवीन विहिर या घटकावर होत असून, नवीन विहिरीची कामे प्रामुख्याने डिसेंबर महिन्यानंतर सुरू करण्यात येतात. विहिर या घटकाचे अनुदान विहिरीच्या मोजमापानुसार देण्यात येते. त्याचप्रमाणे काही जिल्ह्यांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू असल्याने लाभार्थी निवड करण्यात अडचणी होत्या. या सर्व पार्श्वभूमीवर खर्चाचे प्रमाण कमी दिसून येत आहेत. लाभार्थ्यांना तातडीने अनुदान वाटप करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील टोलमधून छोटया वाहनांना सवलत देण्याबाबत**

**(११) * २३७१८ श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील टोलमधून छोटया वाहनाना सवलत देता येईल का याची चाचपणी करण्यात येत असताना या मार्गावर माहे जुलै, २०३५ पर्यंत टोल आकारणी करण्यास मान्यता दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पांवर हलक्या वाहनांना पथकरातून सूट देण्याबाबत वित्तीय व कायदेशीर बाबी तसेच सुसाध्यता तपासून अहवाल सादर करण्यासाठी शासनाने तत्कालीन अप्पर मुख्य सचिवांच्या (सा.बां.) अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीस मुदतवाढ देऊनही त्यांनी अहवाल सादर न केल्यामूळे शासनाने तद्नंतर सुमित मलिक यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने दिनांक १८ एप्रिल, २०१६ रोजी शासनास अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मार्गासाठी एकूण किती खर्च झालेला आहे, टोलच्या माध्यमातून किती रक्कम वसूल झालेली आहे व आता सन २०३५ एवढया दीर्घ काळापर्यंत टोल वसूली करण्याची कारणे काय आहेत, तसेच सुमित मलिक यांच्या अध्यक्षतेखालील समितीने टोल माफीच्या संदर्भातील शासनास सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे व त्यानुषंगाने शासनाने कोणते निर्णय घेतलेले आहेत,
(४) असल्यास, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाच्या आठ पदरी उन्नत मार्गाच्या रुपये ३२१५ कोटी खर्चाच्या कामाना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास सदर काम केव्हा सुरु करुन केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२) होय.
(३) या मार्गासाठी आतापर्यंत २४७८.६१ कोटी एवढा खर्च झालेला असून प्रकल्प किंमतीवरील व्याज, प्रकल्पाच्या देखभाल दुरूस्तीचा खर्च व इतर प्रशासकीय खर्च पथकर वसुलीतून जमा करणे अपेक्षित आहे. सदर कंत्राटानुसार सध्याच्या उद्योजकाचा पथकर वसुलीचा कालावधी दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ रोजी संपत आहे. एकूण ५३१८.४२ कोटी रूपये एवढी टोल वसूली झाली आहे. मुंबई पुणे द्रुतगती मार्गाच्या क्षमतावाढीचे प्रकल्पाची संभाव्य किंमत सुमारे ३२१५ कोटी रूपये असल्याने सदरहू द्रुतगती मार्गावरील टोल वसूलीचा कालावधी २०३५ पर्यंत वाढवण्यात आला आहे. अप्पर मुख्य सचिव (सा.बां) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्याबाबत शिफारस केली आहे. त्यानुसार सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) होय.
(५) सदर कामाबाबत पुर्व अर्हता निविदा दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ रोजी बोलविण्यात आल्या असून २०२०-२०२१ पर्यंत सदर प्रकल्प पुर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे.

-----------------

**ग्लोबल सिटीझन या संस्थेच्या कार्यक्रमास करमणूक शुल्क माफ केल्याबाबत**

**(१२) * २४५८६ श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्लोबल सिटीझन या संस्थेतर्फे "कोल्ड प्ले" या जगप्रसिध्द वाद्यवृंदाचा कार्यक्रम मुंबईतील बीकेसीच्या मैदानावर दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास आयोजित करण्यात येणार असून कार्यक्रमाच्या तिकीटांच्या उत्पन्नावरील कोट्यवधी रूपयांची करमणूक शुल्क माफी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून यासंदर्भात मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास महसूल, पर्यटन इत्यादी विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरूप काय आहे,

(३) उपरोक्त कार्यक्रमाच्या तिकीट विक्रीच्या उत्पन्नावर शासनास किती करमणूक शुल्क मिळणे अपेक्षित आहे व सदर करमणूक शुल्क माफ करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाचे होणारे नुकसान भरून काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) "ग्लोबल सिटीझन" हा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शाश्वत विकास उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी तरुणांना चालना देण्याचे सामाजिक कृतीचे व्यासपीठ असून २०३० पर्यंत जगातील संपूर्ण दारिद्रय निर्मूलन करण्याकामी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचे "ग्लोबल सिटीझन" या संस्थेचे ध्येय आहे. "ग्लोबल सिटीझन इंडिया फेस्टीव्हल" या कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक चलनाची कल्पना भारतात प्रथमच अवलंबविण्यात येत आहे.

"ग्लोबल सिटीझन इंडिया फेस्टिव्हल" चे आयोजन दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ रोजी मुंबई येथे करण्यासंदर्भात मा.मुख्यमत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यक्रमाच्या आयोजकांनी उक्त कार्यक्रमासाठी करमणूक शुल्काच्या आकारणीतून सूट मिळण्याची विनंती केली होती.

"ग्लोबल सिटीझन इंडिया फेस्टीव्हल" या कार्यक्रमाच्या तिकिट विक्रीद्वारे आयोजकांना प्राप्त होणाऱ्या उत्पन्नावर महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींनुसार अंदाजे ७ कोटी इतके करमणूक शुल्क आकारण्यास पात्र होते.

दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या "ग्लोबल सिटीझन इंडिया फेस्टीव्हल" या कार्यक्रमाच्या आयोजनाचे उद्दिष्ट विचारात घेऊन या कार्यक्रमास महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील कलम ६(३) मधील तरतुदींनुसार खालील अटी/शर्तींवर करमणूक शुल्क माफ करण्याचा निर्णय शासनाने शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १० नोव्हेंबर, २०१६ अन्वये घेतला आहे.

१) "ग्लोबल सिटीझन इंडिया फेस्टीव्हल" या कार्यक्रमाकरीता तिकिट विक्रीद्वारे आकारण्यात येणाऱ्या प्रवेश शुल्काच्या तसेच प्रायोजकत्वाच्या माध्यमातून संबंधित आयोजकांना प्राप्त होणाऱ्या रकमेवर महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींनुसार आकारणीस पात्र करमणूक शुल्काच्या रक्कमे इतकी किमान रक्कम किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम ही दारिद्रय निर्मूलन, कुपोषण निर्मूलन, स्वच्छ भारत अभियान, जलयुक्त शिवार योजना यासारख्या विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यात ग्लोबल सिटीझन या संस्थेच्या विद्यमाने विनियोगात आणण्यात येईल, असे शपथपत्र सदर महोत्सवाच्या आयोजकांकडून घेण्यात यावे.

२) तथापि, उक्त शपथपत्रात नमूद केल्यानुसार जर ग्लोबल सिटीझन या संस्थेच्या विद्यमाने वरीलप्रमाणे महाराष्ट्र राज्यात खर्च होणारी रक्कम ही महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींनुसार आकारणीस पात्र करमणूक शुल्काच्या रकमेपेक्षा कमी पडत असेल तर, सदरहू कमी पडणाऱ्या रक्कमेच्या प्रमाणातील फरकाची रक्कम ही "मुख्यमंत्री सहाय्यता निधी" मध्ये किंवा शासन निश्चित करेल त्याप्रमाणे अन्य राज्य निधीकरीता देणे हे सदरहू महोत्सवाच्या आयोजकांवर बंधनकारक राहील.

३) सदर कार्यक्रमांद्वारे आयोजकांना प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या ताळमेळाचे लेखापरीक्षण हे शासकीय अथवा अन्य अभिकर्त्यामार्फत (Agency) करुन घेण्याचा अधिकार शासनास असेल.

४) सदर कार्यक्रमाच्या आयोजनासंदर्भातील सर्व बाबींकरीता तसेच सदरहू कार्यक्रमाद्वारे आयोजकांना तिकीट विक्रीद्वारे/प्रायोजकत्वाद्वारे प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या ताळमेळाबाबत शासनास वस्तुनिष्ठ व अद्ययावत माहिती व त्यासंदर्भातील नियमित अहवाल शासनास सादर करण्याकरीता व वरील क्र.१ मध्ये अभिवचन दिलेले आहे त्याप्रमाणे कार्यवाही होते की नाही याबाबत संनियंत्रण ठेवण्याकामी शासनास मदत करण्यासाठी एका जबाबदार समन्वय अधिकाऱ्याची (Nodal Officer) नियुक्ती करुन सदर अधिकाऱ्याचे नाव, पद, दूरध्वनी/मोबाईल क्रमांक, याबाबतची माहिती शासनास तात्काळ सादर करणे सदर कार्यक्रमाच्या आयोजकांवर बंधनकारक राहील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्याच्या एस टी महामंडळाने एम.एस. या धातुमध्ये गाड्यांची बांधणी करण्याचा घेतलेला निर्णय**

**(१३) * २५५९७ श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या एस टी महामंडळाने अपघात झाल्यास त्याची तीव्रता कमी व्हावी यासाठी स्टीलपासून गाड्यांची बांधणी करण्याचा निर्णय घेतला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने निविदा प्रक्रिया पुर्ण करुन या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) राज्य परिवहन महामंडळाचे वाहन अधिक मजबूत व आकर्षक करण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाने एम.एस. या धातुमध्ये बसचा सांगाडा बांधण्याचा निर्णय घेतलेला असून, त्याबाबतची निविदा प्रक्रिया राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर प्रसारीत करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती, जळगांव ते गुजरात या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत**

**(१४) * २५८१० श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील अमरावती ते जळगांव व जळगांव ते गुजरात हद्दीपर्यतचे चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (एन.एच.ए.आय.) मार्फत सुरु करण्याबाबत मार्ग काढण्यासाठी सदरचा रस्ता हा एनएचएआयकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.मंत्री महोदयांनी एक महिन्यांत निर्णय घेऊन मा.केंद्रीय मंत्री महोदयांसमवेत बैठक लावून निर्णय घेण्यात येण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु आजपावेतो सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाची/आश्वासनाची पूर्तता झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर महामार्गाचे दोन वर्षापूर्वी मा.कैंद्रीय मंत्री, रस्ते यांच्याहस्ते उद्घाटन होऊनही महामार्ग सुरू करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त महामार्गावर अपघाताचे प्रमाणही वाढलेले असून सदर प्रकरणी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) हे खरे आहे.

अमरावती-जळगाव ते गुजरात हद्द हया ४८०.७९ कि.मी. लांबी राष्ट्रीय महामार्ग दिनांक १ एप्रिल, २०१३ रोजी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे चौपदरीकरणाचे कामासाठी हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१५ रोजी विदर्भातील राष्ट्रीय महामार्गाचे कामाचे भूमिपूजन व घोषणा करण्यात आली. अमरावती ते चिखली हया १९४ कि.मी. आणि फागणे-गुजरात हद्द १४०.७९ कि.मी. लांबी महामार्गाचे चौपदरीकरणाच्या कामासाठी दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेले

आहेत. उर्वरीत चिखली ते फागणे हया १५०.०० कि.मी. च्या कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असून निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने दोन भागात निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील निविदा स्वीकृत करण्यात आल्या आहेत असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, धुळे व अमरावती यांनी कळविले आहे.

-----------------

**मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(१५) * २३९०८ श्री.प्रशांत परिचारक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील मंगळवेढा ते निंबोणी तसेच पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील शेवते ते पंढरपूर या रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्य रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असून साईडपट्ट्याही खचल्या आहेत, यामुळे सर्व प्रकारच्या वाहनांना मार्गक्रमण करताना अनेक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून मंगळवेढा व पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील रस्ता दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) व (४) प्रश्नांकित रस्त्यामध्ये मंगळवेढा-खोमनाळ भाळवणी निंबोणी सलगर प्रजिमा ७३ लांबी २९ कि.मी. व आरण ता. हद्द ते करकंब शेवते हाळे कौठाळी शिरढोण पंढरपूर प्रजिमा १३३ लांबी ८३ कि.मी. या दोन रस्त्यापैकी ३८.६० कि.मी. लांबी समाविष्ठ आहे.

या ३८.६० कि.मी. लांबीतील रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्याचे काम प्रगतीत आहे. रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे. रस्त्यांच्या काही लांबीत सुधारणा मजबूतीकरण व डांबरीकरण करणेची कामे व १०.४० कि.मी. लांबीत रस्त्याचे नवीन बांधकाम करणेची कामे शासनाच्या विविध योजनांमधून मंजूरी निधी निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## तिवरे व देवळे साखरपा (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) गावातील फळबागायती शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(१६) * २३७०८ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवरे व देवळे साखरपा (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) गावातील आंबा व काजू पिकांचे सर्वेक्षण चुकीच्या पध्दतीने झाल्यामुळे शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित राहिले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नुकसान भरपाईपासून वंचित राहिलेल्या फळबागायती शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या जुन्या पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(१७) * २४९५० श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आणि नवी मुंबईला जोडणारा जुना पुल माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान खचला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार जीर्ण झालेल्या पुल पाडून नवीन पुल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

प्रश्नाधीन पुल क्षतीग्रस्त झाल्याने खबरदारीचा उपाय म्हणून दिनांक १४ ऑगस्ट, २०१६ पासून पुलावरील वाहतुक बंद करण्यात आलेली आहे.

प्रश्नाधीन जुना पुल पाडून नवीन पुल बांधण्याबाबत कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीत विभागाच्या विचाराधीन नाही.

-----------------

**राज्यातील जलाशयात राबविण्यात आलेल्या केज कल्चर**
**प्रकल्पात झालेला गैरव्यवहार**

**(१८) * २३४७२ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जलाशयात RKVY/NMPS/SF अंतर्गत राबविण्यात आलेल्या केज कल्चर प्रकल्पातील गैरव्यवहाराची चौकशी होण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मस्त्यविकास मंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली असून त्यासंदर्भात अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त, मत्स्यविकास यांना कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.

(२) होय.

(३) आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सदर प्रकरणी गैरव्यवहार झालेला दिसून येत नाही तथापि अपुरे तांत्रिक मनुष्यबळ, व्यवस्थापनाचा अभाव व अपुरा कर्मचारी वर्ग इत्यादी कारणांमुळे सदर प्रकल्पातून अपेक्षित उत्पन्न प्राप्त होऊ शकले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील एसटी बसची भाववाढ रोखण्याबाबत**

**(१९) * २४४७० श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पेट्रोल व डिझेलचे भाव वाढल्याने एसटी बसच्या प्रवासी भाडयामध्ये ६ टक्क्यांनी भाववाढ करण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून राज्यात एसटी बसची भाववाढ होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नंदूरबार व धुळे जिल्हयात ओव्हरलोड वाहतुकीमुळे रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(२०) * २४६६९ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार व धुळे जिल्हयात ओव्हरलोड वाहतुकीमुळे जिल्हा अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नंदूरबार व धुळे जिल्हयातील चेकपोस्टवरून होणाऱ्या अवैध ओव्हरलोड वाहतुकीमुळे शासनाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत तसेच ओव्हरलोड वाहतुक रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
धुळे व नंदुरबार जिल्हयातील काही तालुक्यातील रस्त्यांवर वाळू वाहून नेणाऱ्या अवजड वाहनांची वाहतुक मोठ्या प्रमाणात होत असल्याने रस्ते काही प्रमाणात क्षतिग्रस्त झाले आहे. रस्त्यांच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्याचे काम प्रगतीत असून रस्त्यावरील वाहतूक सुरळीत चालू आहे.
(२) रस्त्यावरील चेक पोस्ट वरुन होणाऱ्या अवैध ओव्हरलोड वाहनांवर कार्यवाही करण्याबाबत पोलीस प्रशासन व परिवहन विभागास विनंती करण्यात आली आहे.
(३) व (४) रस्त्यावरील अवैध जड वाहनांची वाहतूक नियंत्रित करण्याबाबत गृह व परिवहन विभागाच्या मदतीने कार्यवाही प्रगतीत आहे. रस्त्याच्या क्षतिग्रस्त भागातील दुरुस्तीची कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधन्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## मौजे मुंढेवाडी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील भीमा नदीवरील पूलाच्या दुरुस्तीबाबत

**(२१) * २६०२३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मुंढेवाडी (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) या ठिकाणच्या भीमा नदीवरील पुलाचा कठडा तुटला असून पुलाची दुरवस्था झाली असल्याने याबाबत स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी तहसिलदार, पंढरपूर यांच्याकडे पूल दुरुस्तीसाठी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पुलाच्या दुरूस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे. तसेच पाहणीनुसार सदर पुलाच्या आवश्यक त्या दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करून निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. सदर काम लवकरच पूर्ण करण्याचे नियोजन ओह.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पैनगंगा नदीवरील तीन बॅरेजेससाठी करण्यात आलेल्या भूसंपादनात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२२) * २४६८९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ, मराठवाड्याच्या सीमेलगत वाशिम व हिंगोली जिल्हयातून वाहणाऱ्या पैनगंगा नदीवर उभारण्यात आलेल्या ११ ठिकाणच्या बॅरेजेसपैकी जयपूर, दिल्ली आणि सोनगव्हाण या तीन बॅरेजेससाठी करण्यात आलेल्या भूसंपादनात गैरव्यवहार झाल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बॅरेजेससाठी लागणाऱ्या जमिनीचा बिनचूक सर्व्हे करुन योग्य अहवाल सादर करणे अपेक्षित असतानाही हिंगोली भूमि अभिलेख कार्यालयाकडून वारंवार चुकीचा अहवाल सादर केला जात असल्याने याप्रकरणी चौकशीची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी असलेल्या भूमि अभिलेख, हिंगोली कार्यालयातील संबंधित अधिकारी, कर्मचारी व जलसंपदा विभागातील संबंधित कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
बाधित क्षेत्राचा बिनचुक सर्व्हे करून योग्य तो संयुक्त मोजणी अहवाल सादर करणेची शेतकऱ्यांची मागणी आहे. या बाबतचे आवश्यक ते अतिरिक्त भूसंपादनाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी, वाशिम व हिंगोली यांचेकडे सादर करण्यात आलेले असून अतिरिक्त भुसंपादन विषयक कार्यवाही चालु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे येथील तत्कालीन अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी केलेला गैरव्यवहार**

**(२३) * २५६४८ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे येथील तत्कालीन अधिक्षक अभियंता व तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी माहे नोव्हेंबर, २०११ ते जून, २०१३ या काळात केलेल्या लाखो रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणी त्यांचेवर कारवाई करण्यात यावी अशी लेखी मागणी प्रा.लिकायत शेख, अध्यक्ष, अल्पसंख्यांक आघाडी यांनी दिनांक १ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना पत्र लिहून केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता दोषी असल्याचा अहवाल विद्यमान अधिक्षक अभियंता यांनी मुख्य अभियंता, मुंबई यांना लेखी दिला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांचेकडे केलेल्या तक्रारीमध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रमुख बाबी कोणत्या आहेत, तसेच विद्यमान अधिक्षक अभियंता यांनी मुख्य अभियंता, मुंबई यांना पाठविलेल्या अहवालात नमूद केलेल्या बाबी कोणत्या आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) श्री.लियाकत शेख यांचे मा.मुख्यमंत्री महोदयांना उद्देशून लिहिलेले दिनांक २७ जुलै, २०१६ रोजीचे (अ) पदाचा गैरवापर करुन शासकीय निवासस्थानाची देयके शासकीय खर्चातून भागविल्याने शासकीय रकमेच्या अपहार प्रकरणी संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल करावेत व (ब) सदर अधिकाऱ्यांविरुध्द खातेनिहाय चौकशी करुन त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करावे या प्रमुख बाबींसंदर्भातील तक्रार निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

याच विषयाबाबत प्राप्त अन्य तक्रारीच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता, ठाणे (सा.बां.) मंडळ, ठाणे यांचा अहवाल, मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग यांच्यामार्फत शासनास प्राप्त झाला आहे. त्यास अनुसरुन सर्व संबधितांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान टाळण्याकरीता**
**द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत**

**(२४) * २४३३१ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक १९३८१ ला दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सततच्या नैसर्गिक आपत्तीमुळे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना संकटांचा सामना करावा लागत असल्याने द्राक्ष बागांसाठी प्लास्टिक आच्छादनांचा वापर करुन नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांना खर्चावर ५० टक्के अनुदान देण्याची मागणी नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी व महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) नैसर्गिक आपत्तीमुळे द्राक्ष बागांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी "प्लास्टिक आच्छादन" या घटकाचा समावेश एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत करण्याबाबतचा प्रस्ताव, केंद्र शासनाच्या कृषि, सहकार व शेतकरी कल्याण विभागास सादर करण्यात आलेला आहे. याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

**नाशिक जिल्हयातील ब्रिटीशकालीन व सुरक्षा कालावधी संपलेल्या पुलावरील वाहतुक बंद करून पर्यायी उपाययोजना करण्याबाबत**

**(२५) * २३६९४ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील ब्रिटीशकालीन व ज्या पुलांच्या सुरक्षा कालावधी संपला आहे, अशा सगळ्या पुलांचे बांधकाम लेखा परिक्षण (स्ट्रक्चरल ऑडीट) करून कन्नमवार, व्हिक्टोरिया (नाशिक) व अन्य सर्व धोकादायक पुलांचा वापर बंद करावा, अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक येथील मुंबई-आग्रा महामार्गावर असलेला कन्नमवार पुल हा नाशिक शहरास जोडणारा एकमेव पुल (उड्डाणपुल वगळता) असून या जीर्ण, दुरवस्थेत असलेल्या धोकादायक पुलावरुन मोठ्या वाहनांच्या अवजड वाहतुकीस बंदी असतांना या पुलावरून अवजड व अन्य प्रकारच्या वाहनांची वाहतुक सुरुच आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा धोकादायक पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करून या पुलांचा वापर थांबवून पर्यायी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्यामार्फत नाशिक शहरामध्ये बांधण्यात आलेल्या उड्डाण पूलांपैकी व्दारका सर्कल ते के.के.वाघ कॉलेज ह्या भागाचा वापर करण्याचा पर्याय वाहनधारकांसाठी उपलब्ध असून कन्नमवार पूलाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्याच्या दृष्टीने निविदा मागविण्यात आल्या असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

(३) पूलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबत कार्यवाही प्रगतीत आहे. स्ट्रक्चरल ऑडीट पूर्ण झाल्यावर प्राप्त होणाऱ्या अहवालातील निष्कर्षानुसार पूलांची दुरूस्ती अथवा पुनर्बांधणीबाबत कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**माझगाव, मुंबई न्यायालयीन इमारत धोकादायक असल्याबाबत**

**(२६) * २५८८८ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील माझगांव न्यायालयाची इमारत १५ वर्षात धोकादायक ठरविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीचे बांधकाम करणारे सार्वजनिक बांधकाम खात्यातील २ अभियंते दोषी असल्याचे निदर्शनास आले असून त्यांच्यावर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी मा.लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी स्वाधिकारे चौकशी करून शासनास सादर केलेला शिफारस अहवाल दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजी शासनास प्राप्त झाला असून त्यातील शिफारशींच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यातील शासकीय दुग्धशाळांचे पुनर्गठन करण्याबाबत

**(२७) * २३६८२ ॲड.अनिल परब, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय दुग्धशाळा पुर्ववत सुरू करून आरेचे सकस दूध सर्वसामान्यांना उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आरेच्या दुग्धशाळांचे पुनर्गठन व्हावे आणि शासकीय आरे दूध योजना जोमाने कार्यान्वित व्हावी अशी मागणी राष्ट्रीय श्रमिक आघाडी संघटनेने मा.दुग्धविकास मंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दुग्धशाळांमधील कर्मचाऱ्यांची इतर खात्यांमध्ये बदली न करता उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून कामगारांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, शासनाच्या पुरवठयाअभावी ग्राहकांना सकस दूध मिळत नसल्यामुळे भेसळयुक्त दुधाचे प्रमाण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्वयंरोजगार व्यावसायिक म्हणून आरे केंद्र चालकांना मान्यता देऊन दुग्धशाळांचे पुनर्गठन करून दूध योजना कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) होय.

(२) दुग्धव्यवसाय विकास विभागातील अतिरिक्त ठरलेल्या कामगार / कर्मचाऱ्यांना विभागांतर्गत टप्प्या टप्प्याने समायोजन करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे.

(३) महाराष्ट्र राज्यात अन्न व सुरक्षा मानके अधिनियम-२००६, दिनांक ५ ऑगस्ट, २०११ पासून अंमलात आलेला आहे. दूध भेसळ प्रकरणी कार्यवाही करण्याचे अधिकार आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभागाकडे वर्ग करण्यात आले आहे.

(४) शासन निर्णय दिनांक १० जुलै, २०११ व दिनांक २७ जुलै, २०११ नुसार दूध केद्रांचे वाटप करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्हयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(२८) * २५५०० श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून किसन सभेच्यावतीने राजूर येथे मोर्चा काढून तहसिलदार, अकोला यांच्याकडे नुकसान भरपाई देण्याची मागणी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पंढरपूर बसस्थानकाची झालेली दुरवस्था**

**(२९) * २५५४८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर बस स्थानकाची अस्वच्छता, खड्डे, चिखल इत्यादीमुळे दुरवस्था झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बसस्थानकाची दुरवस्था दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशतः खरे आहे.

(२) पंढरपूर आगाराच्या वाहनतळाची दैनंदिन साफसफाई खाजगी संस्थेकडून करण्यात येते. वाहनतळावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे भरुन घेण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------------

**मौजे खरपुडी खुर्द (खंडोबाची) (ता.खेड, जि.पुणे) येथील रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(३०) * २३५८३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे खरपुडी खुर्द (खंडोबाची) (ता.खेड, जि.पुणे) येथील खरपुडी खुर्द विठ्ठल रुक्मिणी मंदिर ते वाकी बु. मुंगीधाट मधील रस्त्याची दुरवस्था झाली असल्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे त्रास होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी ग्रामसेवक / सरपंच, ग्रामपंचायत खरपुडी खुर्द यांनी दिनांक ८ एप्रिल, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर रस्त्यांचे डांबरीकरण करून दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे. मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे निवेदन प्राप्त आहे.

(३) खरपुडी खुर्द ते वाकी बु.मुंगीघाट हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.६० आहे. या रस्त्याची एकूण लांबी आहे. ५.०० कि.मी. असून प्रत्यक्षात लांबी ३.०० कि.मी. आहे. सदर रस्त्याचे काम जिल्हा परिषद स्तरावर "क" वर्ग तीर्थक्षेत्र योजनेतून प्रस्तावित करण्यात आले आहे. निधी उपलब्धतेनुसार सदर काम हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी शहरातल्या एस.टी. डेपोतील कर्मचाऱ्याने रेकॉर्ड रुममध्ये डिझेल ओतून लावलेली आग**

**(३१) * २६०९९ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी शहरातल्या माळनाका परिसरात असलेल्या एस.टी. डेपोतील रेकॉर्ड रुममध्ये डिझेल ओतून पेटवून देण्याचा प्रयत्न निलंबन काळ संपवून पुन्हा कामावर रुजू झालेल्या एस.टी. कर्मचाऱ्यांनेच केल्याची घटना दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माळनाका परिसरात असलेल्या एस.टी. डेपोतील भांडार विभागातील तिकीट मशिन्स व रोकड विभागाला तिसऱ्यांदा आग लागून सुमारे रूपये १५ लाखांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार एस.टी. डेपोला आग लावून नुकसान करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करून नुकसान भरपाई वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी रत्नागिरी आगारातील कार्यशाळा कार्यालयामध्ये श्री.यशवंत रामागडे या रत्नागिरी आगार कर्मचाऱ्याने डिझेल ओतून आग लावण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्यांना दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी निलंबित करण्यात आले आहे. तसेच रत्नागिरी शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करुन श्री.रामागडे यांना अटक करण्यात आली असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**नागपूर शहरातील स्कूल बस व व्हॅनची फिटनेस चाचणी करण्याबाबत**

**(३२) * २५४८४ श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय विद्यार्थ्यांना शाळेत नेणाऱ्या ६०१ स्कूल बसने फिटनेस चाचणी दिली नसल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरांतर्गत १५३९ स्कूल बसेस व व्हॅनची नोंदणी झालेली असून नागपूर (पूर्व) परिवहन कार्यालयांतर्गत ६७५ बसेस व व्हॅन तसेच उर्वरीत नागपूर परिवहन कार्यालयांतर्गत ८६४ बसेस व व्हॅनची नोंद करण्यात आलेली असून या सर्व वाहनांना दिनांक १५ जून, २०१६ च्या अगोदर फिटनेस चाचणी करणे बंधनकारक असतांना ज्या स्कूल बस वा व्हॅनने फिटनेस चाचणी केली नाही अशा बसेस व व्हॅनला विभागामार्फत नोटीस बजावण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्कूल बसेस व व्हॅनची फिटनेस चाचणी करण्याबाबत तसेच नोटीस बजावण्यात आलेल्या वाहनांचा परवाना रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) मा.उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठ यांनी दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी राज्यातील सर्व स्कूल बसेसची दिनांक १५ जून, २०१६ पूर्वी तांत्रिक तपासणी करण्याबाबत निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने नागपूर शहरातील ६५८ बसेस दिनांक २५ नोव्हेंबर, २०१६ पर्यंत चाचणीसाठी हजर झाल्या नाहीत हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) तपासणीसाठी हजर न झालेल्या ६५८ बसेसचा ४ महिन्यासाठी परवाना निलंबित करण्यात आला.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृषि सेवक सरळसेवा पद भरती परिक्षेच्या निकालात गैरप्रकार झाल्याबाबत

**(३३) * २४७६६ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषि आयुक्तालयाने कृषि सेवकाच्या ७३० पदांसाठी दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी घेतलेल्या परिक्षेचा दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी जाहिर झालेल्या निकालात अनियमितता व गैरप्रकार झाल्याने सदर गैरप्रकारची चौकशी होण्याची मागणी उमेदवारांनी मा.कृषि मंत्र्यांकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गैरप्रकाराची चौकशी होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कृषि आयुक्तालयाच्या अधिनस्त विभागीय कार्यालयांतर्गत गट-क संवर्गातील कृषि सहाय्यकांची ७३० रिक्त पदे कृषि सेवक म्हणून निश्चित वेतनावर सरळ सेवेने भरण्यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल दिनांक ६ सप्टेंबर, २०१६ रोजी घोषित करण्यात आला आहे. सदर निकालाच्या अनुषंगाने तक्रारी प्राप्त झाल्यामुळे कृषि सेवक भरती प्रक्रिया सखोल चौकशीपर्यंत स्थगित करण्यात आलेली आहे. आयुक्त (कृषि) यांच्या दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६ च्या चौकशी अहवालाप्रमाणे त्यावर अधिकची माहिती मागविण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नव्याने अस्तित्वात आलेल्या जिल्हयांकरीता स्वतंत्र नोंदणी व मुद्रांक विभागाचे कार्यालय मंजूर करण्याबाबत

**(३४) * २५६३४ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नव्याने अस्तित्वात आलेल्या पालघर, वाशिम, नंदूरबार, हिंगोली आणि गोंदिया या जिल्हयांकरिता स्वतंत्र नोंदणी व मुद्रांक विभागाचे कार्यालय माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कार्यालयातील किती स्वतंत्र कर्मचारी वर्ग मंजूर करुन, सदर कार्यालय कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय दिनांक २३ नोव्हेंबर, २०१६ अन्वये पालघर, वाशिम, नंदुरबार, हिंगोली आणि गोंदिया या जिल्ह्याकरीता सह जिल्हा निबंधक हे प्रशासकीय कार्यालय कर्मचारी वृंदासह नव्याने कार्यान्वित करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. नवनिर्मित पालघर जिल्ह्यातील सह जिल्हा निबंधक कार्यालयासाठी एकूण ८ पदनिर्मितीस मंजूरी देण्यात आली आहे. तसेच नवनिर्मित वाशिम, नंदुरबार, हिंगोली आणि गोंदिया या जिल्ह्यांतील सह जिल्हा निबंधक कार्यालयासाठी प्रत्येकी ७ प्रमाणे एकूण २८ पदनिर्मितीस मंजूरी देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्याच्या सीमा नाक्यावरील लाचखोरी थांबविण्याबाबत**

**(३५) * २३५२० श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सीमा तपासणी नाक्यावर करवसूली करण्यासाठी सीमेवर १३ ठिकाणी अद्ययावत सीमानाके (बॉर्डर चेकपोस्ट) उभारण्यात आले असून परिवहन विभागाच्या बेजबाबदार कामांमुळे महसूलात रूपये ६४० कोटीची तूट आल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, सीमानाक्यांवर सुरू असलेली लाचखोरी थांबविण्याबाबत तसेच, बेजबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाई करून महसूलात होणारी तूट भरून काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) शासनाने दिनांक २५ मार्च, २००८ रोजी परिवहन विभागाच्या एकूण २२ सीमा तपासणी नाक्यांच्या आधुनिकीकरणाचा निर्णय घेतला असून त्यासाठी महाराष्ट्र बॉर्डर चेकपोस्ट नेटवर्क लि. या सेवापुरवठादाराची निवड करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत १३ तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण पुर्ण झाले आहे.

सेवापुरवठादाराने तपासणी नाक्यावर जादाभार असलेल्या वाहनातील जादा माल न उतरविल्यामुळे सदर जादा माल उतरवून घेण्यासाठी येणारा खर्च सेवापुरवठादारास न मिळाल्यामुळे रुपये ६४१.४३ कोटीचे सेवा पुरवठेदाराचे नुकसान झाल्याचे कळविले आहे.

सदर प्रकल्पासाठी सेवा पुरवठेदाराने केलेल्या गुंतवणूकीची भरपाई मिळण्यासाठी सीमा तपासणी नाक्यातून जाणाऱ्या वाहनांकडून सेवापुरवठेदारास सेवा शुल्क वसूल करण्याची परवानगी आहे. त्यानुसार सेवा पुरवठेदाराने सेवा शुल्क वसूल केलेले आहे.

(२) या संदर्भात सहपरिवहन आयुक्तांचे स्तरावर प्राथमिक छाननी करण्यात आली आहे. सेवापुरवठादाराने जून, २०१३ ते मार्च, २०१६ या कालावधीसाठी सदर नुकसान दर्शविले असून सेवापुरवठादाराने चुकीच्या गृहितका आधारे नुकसानीचे गणन केल्याचे प्राथमिक छाननीत आढळले आहे. त्यामुळे यासंदर्भात सीमा तपासणी नाक्यावरील जून, २०१३ पासूनची जादाभार विषयक वाहनांची संगणकीय माहिती घेऊन त्यांची तपशीलवार छाननी करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे. तसेच, सीमा तपासणी नाक्यावरील गुणात्मक वाढ होण्यासाठी सुधारित आदर्श कार्यपध्दती लागू करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### बिलालपाडा (ता.वसई, जि.पालघर) येथील आदिवासींच्या जमिनीवर विकासकाने केलेल्या अवैध बांधकामाबाबत

**(३६) * २५७२१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक २२९६१ ला दिनांक २ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलालपाडा नालासोपारा (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्वे नं. १२०/१ हिस्सा नं. २ क्षेत्रफळ ०-११५.२ हे आर व सर्वे नं. १२२/२ क्षेत्र ०-६ ०.६ हे-आर या आदिवासींच्या जमिनीवर श्री.रामाज्ञा यादव या विकासकाने रहिवासी स्वरूपाचे अवैध बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीस महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ३६ च्या तरतुदी लागू असल्याने करारास जिल्हाधिकारी यांची मान्यता घेण्यात आली नसल्याने सदर करार अवैध ठरविला गेला तसेच आदिवासी खातेदाराने सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेतली नसल्याने याप्रकरणी शर्थभंग झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आदिवासींच्या जमिनी त्यांना परत करण्याबाबत तसेच संबंधित दोषी विकासकावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजे बिलालपाडा, ता.वसई येथील स.नं.१२०/१ क्षेत्र ०-१५.२ हे-आर व स.नं.१२२/२ क्षेत्र ०-६१.६ हे. आर या जमिनी श्री.शंकर महादेव कारेला व इतर आदिवासी खातेदारांचे नावे दाखल आहेत. स.नं.१२२/२ (क्षेत्र ०-६१.६ हे-आर) ही जमीन ९९ वर्षांचे कराराने रुपये १००/- रकमेच्या बंधपत्रावर श्री.रामाज्ञा यादव यांना कोणत्याही विकासकामार्फत विकसित करण्याच्या प्रयोजनार्थ दिनांक ३० डिसेंबर, २००५ रोजी संबंधितांनी दिली होती. त्यानुषंगाने सदर जमिनीवर रहिवासी स्वरुपाचा विकास झाल्याचे दिसून येते मात्र सदर जमिनीस महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ३६ अ च्या तरतूदी लागू असल्याने व उक्त करारास जिल्हाधिकारी यांची मान्यता घेण्यात आलेली नसल्याने सदर करार अवैध ठरतो. तसेच सदर जमिनी आदिवासी खातेदारांना कुळकायद्याने प्राप्त आहेत. सबब त्यानुषंगाने आदिवासी खातेदाराने असा करार करण्यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक होते. यास्तव प्रस्तुत प्रकरणी शर्तभंग झाल्याचे दिसून येत असल्याने शर्तभंगाबाबत तहसिलदार, वसई यांचे न्यायालयात महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या कलम ८४-क अन्वये दिनांक २८ नोव्हेंबर, २०१६ रोजी सुनावणी ठेवली असून उक्त प्रकरणी गुणवत्तेवर निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## यवतमाळ-वर्धा, वारंगा, फाटा-महागाव, मनगाव-यवतमाळ या तीन राष्ट्रीय मार्गाचे चौपदरीकरण करण्याबाबत

**(३७) * २५०८३ श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ वर्धा, वारंगा, फाटा-महागाव, मनगाव-यवतमाळ या तीन राष्ट्रीय मार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या महामार्गावरील वन विभागाची किती जमीन अधिग्रहीत करण्यात येणार असून त्यापैकी किती शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या महामार्गाकरिता किती खर्च येणार आहे तसेच किती कालावधीत सदर महामार्ग पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी बाधित होणार आहे त्यांना मोबदला देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :**

(१) वर्धा-यवतमाळ-महागांव-वारंगा फाटा ह्या २१२ कि.मी. लांबीच्या राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ चे तीन पॅकेजमध्ये चौपदरीकरण करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने घेतला आहे.

(२) या महामार्गासाठी ३३.४४ हेक्टर वन जमीन व ५७४.२०४ हेक्टर खाजगी जमीन आवश्यक असून ७ भूसंपादन अधिकाऱ्यांमार्फत भूसंपादनाची कार्यवाही विविध टप्प्यांवर प्रगतीत आहे.

(३) या २१२ कि.मी. महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी रू.३१४६.१३ कोटी खर्च अपेक्षित आहे.

(४) भूसंपादनाची कार्यवाही सक्षम प्राधिकारी (CALA) यांचेकडून संपादनाची कार्यवाही राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ अन्वये व मोबदल्याची रक्कम RFCTLARR कायदा २०१३ नुसार सुनिश्चित करण्यात येणार आहे व प्रगतीपथावर आहे. भूसंपादनाचे निवाडे अंतिम झाल्यानंतर केंद्र शासनाकडून भुसंपादन अधिकाऱ्यांमार्फत मोबदला देण्यात येणार आहे.

----------------

## परभणी तालुक्यातील अवैध वाळू साठे व लिलाव
## या गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत

**(३८) * २४५१७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी (जि.परभणी) तालुक्यात अवैध वाळू साठे, लिलाव प्रक्रिया न करणे व इतर गैरप्रकार करणाऱ्या उपजिल्हाधिकारी व तहसिदार यांची चौकशी करण्याचे आदेश मा.महसूल मंत्री महोदयांनी सन २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाचे आर्थिक नुकसान करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी पुर्ण करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, संबंधिताकडून आर्थिक नुकसानीची वसुली करण्यासोबतच त्यांना निलंबित करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सन २०१६ च्या पावसाळी अधिवेशनात याच विषयावरील विधानपरिषद तारांकित प्रश्न क्रमांक १९६८५ च्या उत्तरामध्ये मा.मंत्री (महसूल) यांनी तहसिलदार, परभणी व उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी प्रस्तुत प्रकरणी सकृतदर्शनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येत असल्याने त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे नमूद केले होते.
(२) व (३) उपविभागीय अधिकारी, परभणी यांनी दिनांक १६ मार्च, २०१६ च्या पत्रान्वये, तहसिलदार, परभणी यांनी जप्त केलेल्या अवैध रेतीसाठा प्रकरणी सुमारे १,२५,५०,०००/- एवढा महसूल वसूल न केल्याने शासनाच्या झालेल्या नुकसानीबाबत तत्कालीन तहसिलदार, परभणी यांनी विभागीय चौकशी करण्यात यावी, असा अहवाल सादर केला होता.

सदर अहवालावर अपर जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार, अवैधरित्या साठवून ठेवलेल्या वाळूचा लिलाव करण्याकडे उपविभागीय अधिकारी, परभणी व तहसिलदार, परभणी यांनी दुर्लक्ष केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र तयार करून विभागीय आयुक्तांमार्फत शासनास सादर करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, परभणी यांच्या स्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------------

## एसटी महामंडळाने ट्रायमॅक्स कंपनीच्या कराराची मुदत संपल्यानंतरही चालू ठेवल्याबाबत

**(३९) * २४४१९ श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १२७१९ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एसटी महामंडळाने सन २००९ मध्ये प्रवाशांना तिकीट देण्यासाठी ५ वर्षाच्या करारावर वाहकांना ट्रायमॅक्स कंपनीचे इलेक्ट्रॉनिक मशिन देण्यात आले असून वर्षाला ७५ कोटीपेक्षा अधिक तिकिटे विकली गेल्यास प्रत्येक तिकिटांमागे २१ पैसे दराने ट्रायमॅक्स कंपनीला मिळणार तर ७५ कोटीपेक्षा कमी तिकिटे विकली गेल्यास भरपाई म्हणूनही एसटी प्रशासन ट्रायमॅक्सलाच पैसे देईल असा एसटी प्रशासन आणि ट्रायमॅक्स कंपनीत करार करताना एसटीने आपल्या नफ्याचा विचार केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही एसटी महामंडळाने ही सेवा पुढील २ वर्षासाठी आपल्या ताब्यात घेण्याऐवजी पुन्हा ट्रायमॅक्सला देण्याचा निर्णय घेतला यात तिकिटांमागे २१ पैसे हा दर वाढवून ३३ पैसे एवढा दर ठेवण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कराराबाबत एसटीच्या मुख्य सुरक्षा व दक्षता विभागाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करण्याची मागणी शासनाकडे केली असतानाही शासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) राज्य परिवहन महामंडळाने सन २००८-२००९ मध्ये राबविलेल्या निविदा प्रक्रियेमधील निविदा अर्जामध्ये वार्षिक ७५ कोटी पर्यंतच्या तिकीटांसाठी ७५ ते ९० कोटी पर्यंतच्या तिकिटांसाठी तसेच ९० कोटी पुढील तिकिटांसाठी निविदाकारांनी दर भरण्याची तरतूद करण्यात आली होती. महामंडळामार्फत वार्षिक अंदाजे १२० ते १२५ कोटी तिकिट विक्री होत असल्याने किमान ७५ कोटी तिकिट आश्वासित करुन त्यानुसार तीन टप्प्यात निविदाकारांकडून दर मागविलेले होते. यामध्ये राज्य परिवहन महामंडळाने त्यांच्या नफ्याचा विचार केला नाही, असे म्हणता येणार नाही.

(२), (३) व (४) सदर प्रकल्पाचा ५ वर्ष कालावधी संपल्यानंतर दिलेल्या मुदतवाढीमध्ये प्रति तिकिटामागे २१ पैसे एवढा दर देण्यात आला आहे. महामंडळाने मे.ट्रायमॅक्स कंपनीच्या प्रकल्पास दिलेल्या मुदतवाढीबाबत मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी यांनी सादर केलेल्या अहवालावर, सदर प्रकरणी राज्य परिवहन महामंडळाने संचालक मंडळस्तरावर विचार करुन आवश्यकतेनुसार महालेखापाल यांचेकडून विशेष लेखापरिक्षण करुन घेण्याबद्दल कळविण्यात येत आहे.

-----------------

**ठाणे व भिवंडी शहरातील वाहतुक कोंडी सोडविण्याबाबत**

**(४०) * २३४७१ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद महामार्गाकडे जाण्याकरिता वर्सोवा येथील जुना खाडी पुल दुरुस्तीसाठी माहे सप्टेंबर, २०१६ पासून बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पूलावरील वाहतूक घोडबंदर रोड, ठाणे तसेच भिंवडीमार्गे वसईला वळविण्यात आली असल्यामुळे ठाणे व भिवंडी शहरामध्ये मोठी वाहतुक कोंडी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ठाणे आणि मिरा-भाईदर शहरांना जोडणाऱ्या घोडबंदर रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे खाडी समांतर असा बायपास रस्ता बांधण्याकरीता शासनाने रूपये ८० कोटीचा निधी मंजूर केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून घोडबंदर रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवून खाडी समांतर बायपास रस्ता बांधण्याबाबत तसेच, वर्सोवा येथील जुना खाडी पुल वाहतुकीकरीता उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) होय, हे खरे आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत घोडबंदर ते जेसलपार्क खाडी समांतर रस्त्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मराठवाडा विभागातील विशेषत: बीड जिल्हयातील शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळण्याबाबत**

**(४१) * २३४९०  श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागात विशेषतः बीड जिल्हयात माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अतिवृष्टी व मुसळधार पावसामुळे शेती पिकांचे नुकसान झाले असून पीक विमा भरलेल्या शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे विमा कंपनी, कृषि अधिकारी आणि इतर संबंधित यांच्या पथकाकडून विहित वेळेत न झाल्यामुळे शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) नाही.

मराठवाडा विभाग, विशेषत: बीड जिल्हयात दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ ते दिनांक २५ सप्टेंबर, २०१६ व दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ ते दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीमध्ये झालेल्या अतिवृष्टी व  जोरदार पावसामुळे विविध शेत पिकांचे नुकसान झाले होते. त्यानुसार, जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक २९ सप्टेंबर, २०१६ रोजी महसूल, जिल्हा परिषद व कृषि विभागास नमुना सर्वेक्षण करण्याचे आदेश निर्गमित केले. त्यानुसार क्षेत्रिय पातळीवरील तलाठी, ग्रामसेवक व कृषि सहाय्यक व विमा कंपनीचे प्रतिनिधी यांचेमार्फत ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या सप्ताह अखेर नमुना सर्वेक्षण पूर्ण केले.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत पिकांचे अपेक्षित उत्पादनामध्ये उंबरठा उत्पादनाच्या ५० टक्के पेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर नुकसान भरपाईच्या प्रमाणात विमा धारक शेतकऱ्यांना २५ टक्के मर्यादेपर्यंत रक्कम आगाऊ देण्याची तरतूद आहे, परंतु प्रतिकूल परिस्थिती पीक काढणी वेळेच्या १५ दिवस अगोदर आली तर सदर तरतूद लागू होत नाही. बीड जिल्ह्यात दिनांक २३ सप्टेंबर, २०१६ ते दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत मूग व उडीद या पिकांची काढणी अंतिम टप्यात होती तर सोयाबीन व बाजरी पिकाच्या काढणीस नुकतीच सुरूवात झाली होती. त्यामुळे बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीस पीक कापणी प्रयोगातून येणाऱ्या उत्पन्नाच्या आधारे नुकसान भरपाई दिली जाईल.

प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत देय होणारी अंतिम नुकसान भरपाई ही अधिसूचित विमा क्षेत्र घटकातील पीक कापणी प्रयोगांव्दारे प्राप्त होणाऱ्या सरासरी उत्पन्नाच्या आधारे निश्चित केली जाते. त्यानुसार बीड जिल्ह्यातील पीक निहाय अधिसूचित विमा क्षेत्र घटकातील पीक कापणी प्रयोगाचे काम महसूल, जिल्हा परिषद आणि कृषि विभागामार्फत पुर्ण करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील मूग, उडीद, बाजरी व सोयाबीन या पिकांची अधिसूचित क्षेत्र घटकनिहाय सरासरी उत्पन्नाची आकडेवारी प्राप्त झाली असून ती विमा कंपनीस दिनांक १५ नोव्हेंबर, २०१६ रोजी सादर करण्यात आली आहे. विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गावरील सुख नदीवरील खारेपाटण-विजयदुर्ग या धोकादायक पुलाची पुनर्बांधणी करण्याबाबत

**(४२) * २३५०४ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोवा महामार्गाच्या सुख नदीवरील खारेपाटण-विजयदुर्ग हा ७० वर्षापूर्वीचा पूल धोकादायक झाल्याने तो प्राधान्याने नवीन बांधावा अशी मागणी स्थानिक जनतेनी तसेच लोकप्रतिनिधीनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार धोकादायक पुल पाडून नव्याने पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.
(२) पनवेल महाड पणजी रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ च्या चौपदरीकरणांतर्गत विषयांकित सुख नदीवर कि.मी. ३६९/८०० मध्ये पुलाच्या शेजारी नवीन चौपदरी पूल बांधण्याचे काम जानेवारी, २०१५ मध्ये हाती घेण्यात आले असून, सदरील काम डिसेंबर, २०१७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वाडा (जि.पालघर) येथे अपंग शेतकऱ्यांचे शेतीपंपाचे प्रकरण मंजूर करण्यासाठी लाच घेणाऱ्या कृषि विस्तार अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत**

**(४३) * २५३३३ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, अॅड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यात अपंग शेतकऱ्यांचे शेतीपंपाचे प्रकरण मंजूर करण्यासाठी कृषि विस्तार अधिकारी यांना लाच घेताना पकडल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कृषि विस्तार अधिकाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी श्री.एम.जे.जाधव विस्तार अधिकारी (कृषि) पंचायत समिती, वाडा यांचेविरूध्द अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे यांचेमार्फत वाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र.II११/२०१६ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, १३,(१) (ड) सह १३(२) प्रमाणे दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी त्यांच्या दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ च्या आदेशाने श्री.एम.जे.जाधव (विस्तार अधिकारी कृषि) यांना दिनांक १० ऑगस्ट, २०१६ पासून जि.प. सेवेतुन निलंबित केले आहे. तसेच त्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कृषि विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(४४) * २५१९५ श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया, श्री.प्रकाश गजभिये : तारांकित प्रश्न क्रमांक २१७३६ ला दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषि विभागांतर्गत कार्यरत अ, ब, क व ड संवर्गातील कर्मचाऱ्यांची २७५०२ मंजूर पदांपैकी ७४११ पदे रिक्त असल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडा कृषि विभागात विविध संवर्गातील १२०० पदे रिक्त असून या विभागातील शेतकऱ्यांना कृषि विषयक अडचणींना सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय, हे खरे आहे.

कृषि आयुक्तालयांतर्गत गट-अ ते गट-ड मधील कर्मचाऱ्यांची माहे सप्टेंबर, २०१६ अखेर एकूण २७५०२ मंजूर पदापैकी २०१७२ पदे भरलेली व ७३३० पदे रिक्त आहेत.

(२) विभागीय कृषि सहसंचालक, औरंगाबाद व लातूर संभागातील अधिनस्त कार्यालयांमध्ये सप्टेंबर, २०१६ अखेर गट-अ ते गट-ड मधील एकूण १३४८ पदे आहेत.

रिक्त असलेल्या पदांचा अतिरिक्त पदभार नजीकच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना देवून कामकाज पार पाडण्यात येत आहे व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.

(३) गट-क मधील विविध संवर्गातील रिक्त पदे शासनाच्या प्रचलित शासन धोरणानुसार भरण्याची कार्यवाही तातडीने करण्याबाबत आयुक्त (कृषि) यांना कळविण्यात आलेले आहे तसेच गट-ब (कनिष्ठ) मधील ५० पदांच्या भरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरण करण्याबाबत**

**(४५) * २३७२६ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक १४८३८ ला दिनांक १० मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य व केंद्र शासनाने मुंबई ते गोवा महामार्गाच्या दुरवस्थेमुळे वाढते अपघात रोखण्याच्या दृष्टीने महामार्ग चौपदरीकरण करण्याची घोषणा केल्यानंतर सन २०११ मध्ये सुरू करण्यात आलेल्या चौपदरीकरणाचे काम पुर्ण झाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामार्गवर सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना नसल्याने रत्नागिरी जिल्ह्यात गत सहा महिन्यात ३११ अपघातात ५९ प्रवाशी मृत्यूमुखी पडले असून सुमारे १७० प्रवाशी जखमी झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरणाला किती खर्च येणार आहे, तसेच हा रस्ता किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौपदरीकरणात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार आहेत त्यांना मोबदला देण्याबाबत तसेच महामार्गावर सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षक कठडे, नागमोडी वळणे, अवघड घाट, तीव्र उतार इत्यादी माहिती देणारे सूचना फलक लावून महामार्ग चौपदरीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत खाजगीकरणामधून प्रगतीत असलेल्या पनवेल ते इंदापूर ह्या ८४ कि.मी. राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सन २०११ पासून प्रगतीत आहे. कर्नाळा पक्षी अभयारण्या क्षेत्रामधील महामार्ग रूंदीकरणासाठी पर्यावरण व वन विभागाची मंजुरी जलवाहिन्यांचे स्थलांतर तसेच मौ.काराव, नागोठणे व कोलेटी येथील भूसंपादन या बाबींना विलंब झाल्याने तसेच उद्योजकाकडून दिरंगाई झाल्याने प्रकल्पाच्या कामास विलंब झालेला आहे. तथापि, सदर बाबीची पूर्तता करून काम पूर्णत्वास नेण्यात येत असून मार्च २०१८ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) मुंबई-गोवा महामार्गाच्या पळस्पे ते झाराप ह्या ४५०.०० किमी महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी सुमारे रू.९०००.०० कोटी इतका खर्च अपेक्षित असून, सर्वसाधारणपणे सन २०१९ अखेरपर्यंत चौपदरीकरण पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

भूसंपादनाची कार्यवाही सक्षम प्राधिकारी (CALA) यांचेकडून राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ अन्वये प्रगतीत असून मोबदल्याची रक्कम RFCTLARR कायदा २०१३ नुसार सुनिश्चित करण्यात येणार आहे.

सूचनाफलक, कॅट आईज, ब्लिंकर, W type मेटल बीम, क्रॅश बॅरियर, थर्मो प्लास्टिक पेंटीग इ. अशी रस्ते सुरक्षेची कामे केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या मंजूरीच्या अधीन राहून करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुणे शहर व ग्रामीण भागात नदयांवर बांधण्यात आलेल्या ब्रिटीशकालीन धोकादायक पुलांची दुरूस्ती करण्याबाबत**

**(४६) * २४७३७ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर व ग्रामीण भागात नदयांवर बांधण्यात आलेल्या ब्रिटीशकालीन पूल वाहतुकीस धोकादायक झाले असून पुलांवरील वाहतूक पुर्णपूणे बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे तसेच दूरवस्था झालेल्या पूलांच्या स्ट्रक्चरल ऑडिटनुसार पूलांची दुरुस्ती करण्यासंदर्भातील बाब माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धोकादायक झालेले पूल पाडून त्या जागी नवीन पूल उभारण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने निर्णय घेऊन पूलांच्या उभारणीच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत आणि पूलांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत खरे आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील मावळ तालुक्यातील टाकवे येथील पूल कमकुवत झाल्याने जड वाहतूकीस बंद करण्यात आला आहे. उर्वरित पूल सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत सुरू आहे.
(२), (३) व (४) पुणे जिल्हयात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यांवर ३१ ब्रिटीशकालीन पूल आहेत. या पूलांपैकी ५ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे. २६ पूलांचे स्ट्रक्चरल ऑडीटचे काम प्रगतीत आहे. प्राप्त निष्कर्षानुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत पूलांच्या अत्यावश्यक दुरूस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत.

----------------

**आगरवाडा (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील**
**आयटीआयच्या इमारतीची झालेली दुरवस्था**

**(४७) * २३५५४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आगरवाडा (ता.म्हसळा, जि.रायगड) येथे विद्यार्थ्यांना अद्ययावत व्यावसायिक शिक्षण मिळावे याकरीता सुमारे रुपये साडेतीन कोटी खर्च करून दिनांक १० फेब्रुवारी, २०१३ रोजी बांधलेल्या आयटीआय इमारतीचे स्लॅब गळत असून अडीच-तीन वर्षात इमारतीची दुरवस्था झाली असल्याने शिक्षण संस्थेतील विद्यार्थी व शिक्षकांच्या सुरक्षतेची समस्या निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू इमारतींचे बांधकाम संपूर्णत: निकृष्ट दर्जाचे झालेले असल्याने त्रुटी व नादुरूस्तीबाबत आयटीआय प्रशासनाने संबंधित बांधकाम विभागाकडे १५ वेळा तक्रारी केलेल्या असतानाही एकदाही बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आयटीआय इमारतींच्या देखभाल व दुरूस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

इमारतीचा वापर सुरु असताना इमारतीचे स्लॅबच्या काही भागात अति पावसामुळे गळती होत असल्याचे निदर्शनास आले. तथापि सद्य:स्थितीत इमारत सुस्थितीत असून संबंधित विभागाकडून वापरात आहे.
(२) हे खरे नाही.

मागणी केल्याप्रमाणे सदर इमारतीची पाहणी करून कार्यशाळेवरील फुटलेले सिमेंट पत्रे बदलून दुरुस्ती करणेत आलेली आहे.
(३) कार्यशाळेवरील फुटलेले सिमेंट पत्रे बदलून दुरुस्ती करणेत आलेली आहे. तसेच प्रशासकीय इमारतीच्या स्लॅबच्या गळतीचे दुरुस्तीचे काम संबंधित ठेकेदाराकडून दोषदायित्व कालावधीमध्ये करुन घेणेबाबत कार्यवाही सुरु असून जानेवारी, २०१७ अखेर दुरुस्तीचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४८) * २५८५८ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील गोदावरी काठावर असलेल्या मनूर या घाटातून रेतीचा अवैध उपसा सुरू असून त्याची वाहतूक होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) सदर बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील सोयाबीन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(४९) * २५२४० प्रा.अनिल सोले, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोडा, भद्रावती, बल्लारपूर, राजूरा, गोंडपिपरी, कोरपना, जिवती (जि.चंद्रपूर) तालुक्यात माहे सप्टेंबर, २०१६ ते ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत अति पावसामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाचे नुकसान झाल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सह-दुय्यम निबंधक कार्यालय, हडपसर-गाडीतळ (जि.पुणे) येथील कार्यालयात सोयीसुविधा पुरविण्याबाबत

**(५०) * २५१०३ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सह-दुय्यम निबंधक कार्यालय, हडपसर-गाडीतळ (जि.पुणे) येथे कामाकरीता येणाऱ्या नागरीकांना सोयीसुविधेअभावी अनेक गैरसोयींचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील कार्यालयात येणाऱ्या नागरीकांना बसण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसणे, स्वच्छतागृहाची व्यवस्था नसणे, पुरेसा कर्मचारी वर्ग नसणे इत्यादी गैरसोयींचा सामना करावा लागत असून कर्मचारी वर्ग कमी असल्यामुळे नागरीकांना एका कामासाठी तासनतास थांबावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरीकांना पुरेशा सोयीसुविधा देण्याबाबत व कर्मचारी वर्ग वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर-मुंबई द्रुतगती महामार्ग उभारण्याबाबत**

**(५१) * २३७२८ श्री.संजय दत्त, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर ते मुंबई हे सुमारे ७१० किलोमीटर अंतर वाहनाना ताशी १५० किलोमीटर वेगाने अवघ्या सहा तासात पूर्ण करता येईल असा विचार करुन नागपूर-मुंबई द्रुतगती महामार्ग उभारण्याचे शासनाने ठरविलेले असून सदर प्रकल्प सन २०१९ पर्यंत कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे स्वरुप काय आहे व उक्त प्रकल्पामुळे कोणते अन्य लाभ जनतेला मिळणार आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पासाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे व त्यासाठी लागणारा निधी कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या लोकांचे पुनर्वसन कशाप्रकारे करण्यात येणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्स्प्रेस वे हा द्रुतगती महामार्ग (बाधारहीत) अंदाजे ७१० किमी. लांबीचा असुन त्यास फक्त ठराविक अंतरावरील इंटरचेंज मधुन वाहनांना त्यावर प्रवेश अथवा निर्गमन देण्यात येईल. त्याचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.

महामार्ग हरित क्षेत्रातुन (Green Field) जाणार आहे, महामार्गासाठी जमीनींची रुंदी Right of way (ROW) १२० मीटर असणार आहे, १५० किमी. प्रति तास इतका वाहनाचा वेग गृहीत धरुन द्रुतगती मार्गाचे संकल्पन प्रस्तावित आहे, रस्त्यासाठी आवश्यक जमीन ही जमीन एकत्रिकरण योजनेतून (Land pooling) प्राप्त करुन घेण्यात येणार आहे, दुभाजकासह सदर महामार्गाची धावपट्टी ३+३ मार्गिकेची काँक्रीटमध्ये प्रस्तावित आहे, सदर महामार्गाच्या लांबीत एकूण २४ ठिकाणी नवनगरे निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर महाराष्ट्र समृध्दी महामार्ग एकूण १० जिल्ह्यातून जात असून एकूण २४ जिल्ह्यांना जोडला जाणार आहे. या समृध्दी महामार्गामुळे औद्योगिक व वाणिज्यीक गुंतवणुकीत वाढ होऊन कृषि व कृषिपूरक उद्योगांना चालना मिळून ग्रामीण भागातील आर्थिक विकासाचा दर उंचावणार आहे.

(३) सदरहू प्रकल्पासाठी अंदाजे रुपये ४६००० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे.

या प्रकल्पाच्या निधीसाठी १. बहुआयामी वित्तीय सहाय्य २.सार्वभौम वित्तीय सहाय्य ३.व्यावसायीक वित्तीय संस्थेचे सहकार्य ४.पायाभुत कर्ज रोखे उभारुन या वित्तीय पर्यायांच्या माध्यमातून निधी उभारण्यात येणार आहे.

(४) या द्रुतगती महामार्गाची आखणी पुर्णत: (ग्रीन फिल्ड) हरितभागातुन आहे या रस्त्यासाठी आवश्यक जमीन ही जमीन एकत्रिकरण योजनेतून प्राप्त करुन घेण्यात येणार असून ज्या लोकांची जमीन या प्रकल्पासाठी घेण्यात येईल त्यांना त्यांच्या जमिनीच्या मोबदल्यात विकसित बिनशेती भूखंड अनुज्ञेय व देय राहील व या भूखंडास दहा(१०) वर्षानंतर त्याचे योग्य बाजार मुल्य प्राप्त होत नसल्यास भूसंपादन अधिनियम २०१३ प्रमाणे देय होणारा मोबदला देऊन व्याजासह भूखंड शासनाकडून पुर्नखरेदीची तरतुद आहे. तसेच त्यांच्या जमिनीच्या प्रतवारीनुसार पुढील १० वर्षांसाठी वार्षिक अनुदानही देण्यात येईल. जमिनीच्या विकासावरील व त्यावरील बांधकामाचा मोबदला तसेच या बांधकामाची सामुग्री नेण्यास परवानगी राहील. भूखंड धारकांना कुटूंबातील एका पात्र व्यक्तीस किमान कौशल्य प्राप्त करुन देणारे व्यावसायिक प्रशिक्षण अनुज्ञेय राहील.

-----------------

### अकोट (जि.अकोला) रोडवरील रेल्वे पुलाचे नुतनीकरण करण्याबाबत

**(५२) * २५८११ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) रोडवरील रेल्वे पुलाच्या मध्यभागी भेगा पडून पूल जीर्ण अवस्थेत असून पुलावरून वाहतूक केल्यास पुल हालत असून मोडकळीस आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुल हा सन १९५७ मध्ये बांधण्यात आलेला तो वाहतुकीस योग्य नसल्याने नव्याने पुल बांधावा लागणार असल्याचा प्रस्ताव रेल्वे विभागाने शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर पुल नव्याने बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

सदर रस्त्यावरील मुख्य पुल रेल्वे विभागाच्या अखत्यारीत असून सदर पूल हा वाहतुकीस सक्षम व मजबुत असल्याबाबत असिस्टंट डिव्हिजनल इंजिनिअर वेस्ट अकोला यांनी त्यांचे पत्र क्र.बी-५ दिनांक १२ जुलै, २०१६ अन्वये कळविले आहे.

(२) नाही.

सद्यस्थितीत शासन स्तरावर (केंद्र व राज्य स्तर) सदर पुलाचे नव्याने बांधकामाबाबतचा कोणताही प्रस्ताव नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्हयातील बांदा-आरोसबाग शेर्ले-बांदा या गावांमध्ये पूल बांधण्याबाबत**

**(५३) * २३८४५ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील तेरेखोल नदीतून येणारे पाणी माडखोल, ओटवणे, कासमार्गे बांदा-सावंतवाडी येथील बांदा-आरोसबाग, शेर्ले-बांदा, नईबाग गावातून पुढे जात असून या गावांपैकी बांदा-आरोसबाग शेर्ले-बांदा या गावांमध्ये पूल बांधण्याची मागणी मागील ४० वर्षापासून होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांमध्ये पूल न बांधल्यामुळे गावातील नागरीक, विद्यार्थी होडीमार्गे प्रवास करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, होडीसेवा मेरिटाईम बोर्डाने बंद केल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर गावांतील नागरिकांना प्रवास करण्याकरीता पूल बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे आहे
(३) होडीने होणारी अनधिकृत प्रवासी वाहतूक सुरक्षिततेच्या कारणास्तव मेरिटाईम बोर्डाने बंद केली आहे.

सुरक्षित प्रवासी वाहतूक करण्याच्या अनुषंगाने आवश्यक बाबींची पूर्तता करण्याबाबतच्या सूचना मेरिटाईम बोर्डाने संबंधितांना दिल्या आहेत.
(४) नाबार्ड २१ मधून सदर पूलास मंजूरी प्राप्त असून सदर अंदाजपत्रक तांत्रिक मंजूरी स्तरावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पेण (जि.रायगड) तालुक्यातील भात पिकावर गळ्या किडीचा प्रार्दुभाव झाल्याबाबत**

**(५४) * २४९५१ श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील भात पिकावर गळ्या किडीचा प्रादुर्भाव होवून भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भात शेतीची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्‌नुसार भात शेती नुकसानधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) गळ्या किडीचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आले नाही. तथापि, बगळ्या (सुरळीतील अळी) हा रोग दिसून आला.

कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत व बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील शास्त्रज्ञांच्या समवेत बोर्झे, वढाव, मळेघर येथे पाहणी केली व शेतकऱ्यांच्या भेटी घेवून त्यांना सुरळीतील अळींचे नियंत्रण करण्याविषयी मार्गदर्शन केले. अळीच्या नियंत्रणाविषयी ग्रामपंचायतीच्या फलकावर विद्यापीठाकडील ॲडव्हायझरी लावण्यात आली. तसेच वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात आली. वेळेवर उपाययोजना करून रोगावर नियंत्रण करण्यात आले. त्यामुळे नुकसानाची तीव्रता केवळ ५% एवढी होती.

किडरोगाचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या खाली असल्याने नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**आरे कॉलनी (मुंबई) परिसरात उभारण्यात आलेल्या**
**अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत**

**(५५) * २३४७३ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आरे कॉलनी (मुंबई) परिसरातील अनधिकृतपणे उभारण्यात आलेली बांधकामे, बंगले आणि गोदामांवर कारवाई करून आरे कॉलनी परिसर सुरक्षित राहण्यासाठी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मा.दुग्धविकास मंत्री यांनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मागितलेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर माहिती शासनास प्राप्त झालेली असतानासुध्दा कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आरे कॉलनी (मुंबई) परिसरातील अनधिकृत बांधकामे, बंगले व गोदामांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) मा.मंत्री (पदुम) यांच्या दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये आरे कॉलनी परिसराबाबत एकूण ६ मुद्दयांबाबतची माहिती मागविण्यात आली होती.
(२), (३) व (४) आरे दुग्धवसाहतीतील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे यावर सुरक्षा विभागामार्फत चोख निगराणी ठेवून या बाबी निदर्शनास आल्यास त्वरीत निष्कासनाची कार्यवाही आरे प्रशासनामार्फत करण्यात येते. सुरक्षा विभागामार्फत दिनांक १ जानेवारी, २०१५ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ या कालावधीत एकूण १,४७२ अनधिकृत झोपड्या/बांधकामे निष्कासन करण्यात आलेले आहे व विविध प्रकरणात एकूण ९९ व्यक्तींवर स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

----------------

### नागपूर येथील दुग्ध व्यवसायाची जमीन भाडेतत्त्वावर कंपनीला देण्याबाबत

**(५६) * २५२९५ श्री.प्रकाश गजभिये, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासन व मदर डेअरी फ्रूट ॲण्ड व्हेजिटेबल प्रा.लि. यांच्यात सामंजस्य करार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील दुग्ध व्यवसायाची २१.८६ एकर जमिनीपैंकी ९.८८ एकर जमीन ३० वर्षासाठी नामपात्र भाडेतत्वावर कंपनीला देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, करार होऊनही प्रत्यक्ष कार्य होऊ शकले नाही, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) नाही, सदर करार राज्य शासन व केंद्र शासनाच्या कृषि विभागाच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ यांच्यात झाला आहे.

(२) होय.

(३) दिनांक १६ डिसेंबर, २०१३ रोजी सामंजस्य करार झाल्यानंतर जिल्हाधिकारी, नागपूर व राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाची स्वत:ची पूर्ण मालकी असलेल्या मदर डेअरी फ्रुट ॲण्ड व्हेजिटेबल या सहाय्यक कंपनीसमवेत दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी भाडेकरार झाल्यावर लगेचच कंपनीचे कामकाज सुरु झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यातील थकित मुद्रांक शुल्क वसूल करण्याबाबत

**(५७) * २४६९९ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेअर खरेदी व विक्री, धातू इ. ९२ प्रकारच्या वस्तू साहित्यावर मुद्रांक शुल्क वसूल करण्याची नियमावली असूनही सन २००७ पासून राज्यात हजारो कोटी रूपयांचे शुल्क वसुल करण्यात आले नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार थकित मुद्रांक शुल्क वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मनोर-वाडा-भिवंडी रस्त्याचे ठेकेदार सुप्रिम इन्फास्ट्रक्चर यांनी खनिज व स्वामित्वधनाचा अपहार केल्याबाबत**

**(५८) * २५६५७ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनोर-वाडा-भिवंडी रस्त्याचे ठेकेदार सुप्रिम इन्फास्ट्रक्चर यांनी माती, खडी व रेती या खनिजाची ७ लाख ५० हजार ब्रास गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची सुमारे २९ कोटी इतकी रक्कम शासनाला न देता त्याचा अपहार केल्याबाबतच्या तक्रारीची उपायुक्तांमार्फत चौकशी केल्यानंतर सदर बाब दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित कंपनी व ठेकेदारांकडून पाचपट दंडासह सदर रक्कम वसूल करावी अशा आदेशाचे पत्र जिल्हाधिकारी, ठाणे व पालघर यांना माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्तांकडून प्राप्त झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हाधिकारी, ठाणे व पालघर यांनी विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार संबंधित कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मनोर-वाडा-भिवंडी या रस्त्याच्या कामासाठी गौण खनिजाच्या स्वामित्वधनाची चोरी झाल्यासंबंधी शासनास प्राप्त झालेल्या विविध निवेदनांच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत सखोल चौकशी करुन कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी सदर प्रकरणाची उप आयुक्त (रोहया) यांच्यामार्फत केलेल्या चौकशीत एकूण ७,५०,००८ ब्रास गौण खनिजाचे स्वामित्वधन शासन जमा केले नसल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक १८ जुलै, २०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे व जिल्हाधिकारी, पालघर यांना पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

त्यानुसार तहसिलदार, पालघर व वाडा यांनी दंडाचे आदेश पारित केले असून, तहसिलदार भिवंडी यांनी देखील संबंधितांना अवैध उत्खननाबाबत दंडात्मक कारवाईची नोटिस बजावली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गिरणा प्रकल्पातील (जि.नाशिक) पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा देण्याबाबत

**(५९) * २४३३२ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणा प्रकल्पातील (जि.नाशिक) सन १९७६ पूर्वीच्या पुनर्वसित गावठाणांमध्ये पुरवावयाच्या नागरी सुविधांबाबत विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक ३१ जुलै, २०१४ रोजी शासनाकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवलेली अंदाजपत्रके नियोजन विभागाच्या मूल्यमापन समितीच्या शिफारशीसाठी प्रदीर्घ काळापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अंदाजपत्रकांना मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही. सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावांमधील नागरी सुविधा कामांच्या प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव मूल्यामापन समितीकडे पाठविण्यात येत नाहीत.

(२) हे खरे आहे.

(३) पुरेशा निधीअभावी सन २०१४-२०१५, २०१५-२०१६ या कालावधीत पुनर्वसनाच्या नागरी सुविधा कामांना नवीन प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या नव्हत्या. आता, सन २०१६-२०१७ मध्ये प्रशासकीय मान्यता देण्याच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यतेस्तव प्राप्त परंतु जुन्या दरसुचीनुसार आधारित असलेली अंदाजपत्रके चालु दरसूचीनुसार परिगणित करुन फेरसादर करण्याचे निर्देश प्रकल्पयंत्रणेकडून सुधारीत दरसूचीनुसार परिगणित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव प्राप्त झाला असून तो विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य व केंद्र शासनाची संयुक्त रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी स्थापन करण्याचा घेतलेला निर्णय

**(६०) * २३६९६ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड-मालेगांव-धुळे-इंदौर रेल्वेमार्गाच्या कामाला गती देण्यासाठी मुंबई येथे दिनांक २८ एप्रिल २०१६ रोजी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत राज्य व केंद्र शासनाची संयुक्त रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीची स्थापना करण्यात आली आहे काय व संयुक्त बैठकीतील निर्णयानुसार भुसंपादनासह, रेल्वे मार्ग निर्मितीच्या अनुषंगाने प्रत्यक्ष कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे काय,

(३) असल्यास, रेल्वे आणि शिपींग मंत्रालयाच्या संयुक्त आर्थिक सहभागातुन सदरील प्रकल्प घेण्याच्या प्रस्तावाचे अनुषंगाने दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास नवी दिल्ली येथे उच्चस्तरीय बैठक संपन्न झाली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील संयुक्त आर्थिक सहभागाबाबतचा करार होऊन प्रत्यक्ष काम सुरु होण्याचेदृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २१ एप्रिल २०१६ रोजी उच्चस्तरीय बैठकीत संयुक्त रेल्वे इंन्फ्रास्ट्रक्चर कंपनी स्थापन करण्यचा तत्वत: निर्णय घेण्यात आला.

(२) महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत सुविधा महामंडळ स्थापन करण्यची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मंत्रालय इमारतीच्या दुरुस्तीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(६१) * २३७९८ ॲड.अनिल परब, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरिशभाई पटेल :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालयाला लागलेल्या आगीनंतर नूतनीकरण केलेल्या मंत्रालय इमारतीसाठी बांधकाम मजबूती प्रमाणपत्र (स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट) प्राप्त झाले आहे काय,

(२) असल्यास, मंत्रालय इमारतीचे नुतनीकरणाचे कामाकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात आली होती काय, त्याकरिता कोणत्या कंपनीची निवड करण्यात आली व सदर प्रकिया पार पाडतांना निविदा काढण्यात आल्या होत्या काय,

(३) असल्यास, रूपये २६० कोटी खर्च करून बांधण्यात आलेल्या इमारत नुतनीकरणाचे काम कोणाच्या देखरेखीखाली केले गेले तसेच बांधण्यात आलेल्या इमारतीची हमी कंपनीकडून घेण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील मंत्रालय इमारत दुरुस्तीच्या कामात रूपये २ कोटींचा गैरव्यवहार झाला असून त्याची एसीबीमार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) मंत्रालय इमारतीचे नुतनीकरणाचे कामाकरिता मे.राजा अडेरी, खाजगी वास्तुविशारद यांची वास्तुशास्त्रज्ञ म्हणून नियुक्ती करण्यास दिनांक १ ऑगस्ट, २०१२ च्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली होती व मे.राजा अडेरी यांनी त्यांचेमार्फत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार व इतरांशी करारनामा केलेला होता.

(३) मंत्रालय मुख्य इमारतीच्या नुतनीकरणाच्या कामावर एकूण एकत्रित खर्च रुपये २२०.०० कोटी झाला आहे. मंत्रालय मुख्य इमारतीच्या नुतनीकरणाचे काम खाजगी वास्तुशास्त्रज्ञ मे.राजा अडेरी व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते यांचे देखरेखीखाली पूर्ण करण्यात आले आहे. मे.राजा अडेरी कंन्सल्टंट प्रा.लि., मुंबई यांनी मंजुर करारनाम्यातील तरतूदीनुसार व विनिर्देशानुसार काम केले असून व सर्व आवश्यक ना हरकत प्रमाणपत्रांसह काम पूर्ण झाले असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिले आहे.

निविदेमध्ये दोष दायित्व कालावधीची तरतूद अंतर्भूत आहे.

(४) लाच लुचपत प्रतिबंधक विभागामार्फत मा.डॉ.किरिट सोमय्या, खासदार यांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०१३ रोजी अग्रेषण पत्रासह पाठविलेल्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाबाबतचा अहवाल लाच लुचतप प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग मुंबई यांचे कार्यालयास दिनांक १६ जून, २०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील पशुधन विकास केंद्रांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(६२) * २५५४९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर (जि.सोलापूर) तालुक्यात श्रेणी १ व २ ची एकूण १५ पशुधन विकास केंद्रे असून सदर ठिकाणी कर्मचारी, औषधांचा पुरवठा, उपचार कक्ष व इमारती नसल्यामुळे पशुवैद्यकांना सेवा देण्यात अडचणी येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर ठिकाणी कर्मचारी, उपचार कक्ष, इमारत व औषधांचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर :** (१) हे खरे नाही

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा-काजू बागायतदारांना पीक विमा योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत**

**(६३) * २६१४४ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा पीक विमा योजनेतील निकषांमध्ये अवकाळी पावसाचा आणि कमाल तापमानाच्या कालावधीबाबत विचार न केल्याने नुकसान होऊनही कोकणातील आंबा बागायतदारांना पीक विमा योजनेचा लाभ घेता येणार नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीक विमा योजनेतील आंबा व काजू या पिकांचा विमा उतरविण्यासाठी श्रीराम जनरल इन्शुरन्स या कंपनीची नियुक्ती करण्यात आली असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना रूपये १ हजार ८१५ चा हफ्ता भरावा लागणार असून केंद्र व राज्य शासनाचा समभाग प्रत्येकी ३ हजार ६३० रुपये राहणार व विमा संरक्षित रक्कम प्रती हेक्टर रूपये १ लाख १० हजार तर गारपीटसाठी रुपये ३६ हजार ७०० असणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेच्या निकषांमध्ये अवकाळी पावसाचा कालावधी कुठल्या आधारावर ठरविण्यात आला व चुकीच्या निरिक्षणाअंती ठरविलेला अवकाळी पावसाच्या कालावधीचे निकष बदलून आंबा-काजू बागायतदारांना पीक विमा योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मनोर-वाडा-भिवंडी (जि.पालघर) महामार्गाच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामाबाबत**

**(६४) * २४७७५ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंद ठाकूर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर-वाडा-भिवंडी (जि.पालघर) महामार्गाच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे तसेच सुरक्षेविषयक पुरेशी खबरदारी न घेतल्यामुळे येथे सुमारे १४१ प्रवाशांचा मृत्यू झाला असून १५४० जण जखमी झाले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंपनीवर कारवाई करुन सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही

सदरचे अपघात हे वाहतुकीचे नियम न पाळल्याने वाहनचालकांच्या चूकीमुळे घडलेले असल्याबाबत पोलीसांच्या अहवालातून आढळून येते.

(२) मनोर-वाडा-भिंवडी रस्ता रा.मा.-७६ या रस्त्यावरील दुरूस्तीचे काम उद्योजकाकडून करून घेण्याचे प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाचे मुंबई सेंट्रल येथील आगार बंद करण्याचा घेतलेला निर्णय**

**(६५) * २५७५० श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या अल्प प्रतिसाद व वाहतूक कोंडीचे कारण देत कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात मुंबई सेंट्रल आगारातून सुटणाऱ्या आणि येणाऱ्या एक हजार गाड्या टप्प्या टप्प्याने बंद करीत आगार बंद करण्याचा निर्णय घेतला असल्याचे दिनांक ३ सप्टेंबर २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई सेंट्रलहून सुटणाऱ्या बस लालबाग आणि परिसरातील कोकणवासीयांसाठी सोयीच्या असून त्या बंद झाल्यास नागरिकांची गैरसोय होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी वाहतुक गाड्यांच्या दरांशी आणि सेवेशी स्पर्धा करण्याचे सोडण्याचाही निर्णय महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार एसटी बस मधून प्रवास करण्यासाठी प्रवाशांचा प्रतिसाद वाढविण्याकरिता व एसटीच्या विस्तारीकरणासाठी तसेच, मुंबई सेंट्रल आगारातून सुटणाऱ्या गाड्यांचे अन्य आगारातून नियोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.

दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ रोजीच्या वर्तमानपत्रांमध्ये सदर बाबतचे वृत्त प्रसिध्द करण्यात आले होते. परंतु मुंबई सेंट्रल आगार बंद करण्याचा कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

मुंबई विभागातील चालक/वाहकांच्या कमतरतेमुळे मुंबई आगाराकडून १२ फेऱ्या सातारा विभागाकडे वर्ग करण्यात आलेल्या असून उत्पन्न व भारमानाअभावी आगाराची ९ नियते बंद करण्यात आली आहेत. तसेच मुंबई आगाराकडून आजरोजी ३०० पेक्षा जास्त फेऱ्या चालनात आहेत. त्यामुळे प्रवाशांची कोणत्याही प्रकारे गैरसोय झालेली नाही.
(३) नाही.

राज्य परिवहन महामंडळाची सेवा अधिक उत्तम व स्पर्धात्मक रहाण्याकरिता विविध पातळीवर प्रयत्न करण्यात येत आहे.
(४) राज्य परिवहन महामंडळाकडे प्रवाशी आकर्षित होण्याकरिता सेवेमध्ये सुधारणा व प्रवाशांना आधुनिक सुविधा देण्यासाठी हिरकणी बसेसच्या आसन सुविधेत बदल करुन त्या पुशबॅक करण्यात आलेल्या आहेत.

तसेच यापुढे साध्या व निमआराम बसेस ऐवजी वातानुकूलित बसेस प्रवाशांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. महामंडळाकडून विनावाहक विनाथांबा थेट सेवा सुरु करण्यात आली असून त्यामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या एकूण ७७९ फेऱ्या सुरु करण्यात आलेल्या आहेत. मुंबई विभागातील चालक/वाहकांच्या कमतरतेमुळे मुंबई आगाराकडून सातारा मार्गावरील १२ फेऱ्या सातारा विभागास वर्ग करण्यात आल्या असून उक्त फेऱ्या सातारा विभागामार्फत चालविण्यात येत आहेत.

तसेच अवैध प्रवासी वाहतूकीस आळा घालण्याकरीता शासनाने दिनांक १४ जानेवारी, २०१६ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परभणी शहर बाहय वळण रस्त्याच्या कामाबाबत**

**(६६) * २४५२१ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग २२२ च्या परभणी शहराबाहेरून जाणाऱ्या बाह्यवळण रस्त्याच्या जमीन मोजणीसाठी लागणारा निधी राष्ट्रीय महामार्ग मुंबई यांनी माहे मार्च-एप्रिल, २०१६ दरम्यान भू-संपादन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांच्याकडे वर्ग केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाहयवळण रस्त्याकरीता लागणाऱ्या जमिनीचा सर्व्हे, मोजणी आदी प्रक्रिया करून त्यासाठी लागणाऱ्या खर्चाबाबतचा अहवाल भूसंपादन विभागामार्फत शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत थोडक्यात माहिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) सदर प्रकरणात राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ अन्वये ३ (A) ची अधिसूचना दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी प्रसिध्द झाली असून कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, नांदेड आणि भूमी अभिलेख विभाग, परभणी, पुर्णा व मानवत यांचे अहवालानुसार प्रकरणात मोजणीची कार्यवाही चालू आहे.

-----------------

**मौजे देवसरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(६७) * २३९६२ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवसरी (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) या अतिवृष्टी व पुराने बाधित झालेल्या गावांचे मौजे आंबवन येथे पुनर्वसन करणेबाबतचा प्रस्ताव माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडून शासनास प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावाच्या पुनर्वसनासाठी मौजे आंबवन येथील जागा निश्चित करण्यात आली असून पुनर्वसनाच्या कामासाठी लागणारा निधीही शासनाने मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पुराने बाधित झालेल्या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची शासन स्तरावर छाननी करण्यात येत आहे.

-----------------

**माजलगाव (जि.बीड) जिल्हापरिषद बांधकाम उप विभागात झालेला गैरव्यवहार**

**(६८) * २३६०४ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १९५२३ ला दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) तालुक्यातील जिल्हा परिषद बांधकाम उप विभागात तत्कालीन उपविभागीय अभियंत्याने केलेल्या गैरव्यवहाराचा चौकशी अहवाल दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी चौकशी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना सादर करुनही दोषींविरुद्ध कोणतीही कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवालात कामे न करता बोगस देयके अदा केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करून गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच गैरव्यवहार करणाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी नियुक्त केलेल्या चौकशी समितीच्या अहवालानुसार सदर प्रकरणी जबाबदार असलेले श्री.एनगंटवार, शाखा अभियंता यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्या स्तरावरून निलंबित करण्यात आले असून त्यांच्याविरूध्द मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांनी विभागीय चौकशी सुरू केली आहे. तसेच सदर प्रकरणी जबाबदार असलेले अन्य संबंधित अधिकारी यांच्याविरूध्द शिस्तभंगविषयक कार्यवाहीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांच्याकडून मागविण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नेवासा (जि.अहमदनगर) येथील कृषि कार्यालयात झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(६९) * २३७६९ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील कृषि कार्यालयात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेत लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार गैरव्यवहार करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) याप्रकरणी तालुका कृषि अधिकारी, नेवासा यांनी भ्रष्टाचार केल्याबाबतची तक्रार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, अहमदनगर यांच्याकडे प्राप्त झाली आहे. त्यानुषंगाने चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली असून चौकशी अधिकाऱ्यांचा चौकशी अहवाल प्रतिक्षेत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---------------------

**सातपाटी-मुरबे (जि.पालघर) येथील समुद्राच्या खाडीतील गाळ काढण्याबाबत**

**(७०) * २६०६६ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपाटी-मुरबे (जि.पालघर) येथील बोटींना सुरक्षित किनारी येण्यासाठी समुद्राच्या खाडीतील गाळ काढण्याबाबत सातपाटी मच्छिमार वि.का.सं. व सातपाटी फिरशमेन्स सर्वोदया सहकारी संस्था यांच्या मागणीनुसार सन २०१२-२०१३ मध्ये तत्कालीन मा.पालकमंत्री, ठाणे यांच्या दालनात झालेल्या बैठकीत रूपये २१ कोटीची प्रशासकीय मंजूरी मिळून सुध्दा यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गाळ न काढल्यामुळे ओहोटीच्या वेळी बोटी ४-५ दिवस खाडीत येत नसल्यामुळे बोटीतील जाळी, मासे, बर्फ, डिझेल, पाणी, अन्नधान्य इत्यादी साहित्य नेताना मच्छिमारांची दमछाक होऊन आर्थिक नुकसान होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सातपाटी बंदरात ओहोटीच्या वेळी काही काळ मासेमारी बोटी बंदरात येऊ शकत नसल्यामुळे सातपाटी बंदरातील गाळ काढण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) सन २०१३-२०१४ मध्ये सातपाटी खाडीमधील ८९,४४५ घनमीटर गाळ उपसणी करण्यात आली असून २.०० मीटर खोली उपलब्ध आहे. सन २०१६-२०१७ मध्ये ३.०० लाख घनमीटर गाळ उपसणी प्रस्तावित आहे.

सद्यस्थितीत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे ड्रजर व हॉपर बार्ज मार्फत सातपाटी खाडीतील गाळ काढण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

-----------------

## मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील भगवतगड आणि बांदिवडे गावांना जोडणाऱ्या पुलाच्या दुरुस्तीबाबत

**(७१) * २४१५१ श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.नारायण राणे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील भगवतगड आणि बांदिवडे गावांना जोडणारा कालावल खाडीपात्रातील बांदिवडे गावाजवळील पुल खचला असून याठिकाणच्या सिमेंटच्या मोऱ्या पृष्ठभागांवरील स्लॅपपासून निसटल्यामुळे हा पुल वाहतूकीस धोकादायक बनला असतानाही या खचलेल्या पुलावरुन शाळकरी मुलांसह, नागरीकांना धोकादायक जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलाची विनाविलंब पुनर्बांधणी करण्याबाबत ग्रामस्थांनी तसेच बांदिवडे व चिंदर ग्रामपंचायतीने पुलाची नव्यानी उभारणी करण्यात यावी, असा ठराव पारित करुन उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मालवण, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी, कार्यकारी अभियंता, जिल्हापरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, ओरोस, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे मागील १ वर्षापासून सातत्याने मागणी करत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार भगवतगड व बांदिवडे गावांना जोडणारा कालावल खाडी पात्रातील बांदिवडे गावांतील पुलाच्या पुनर्बांधणीचे काम नव्याने हाती घेवून तो वाहतुकीसाठी कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) विषयांकित पुल हा पुल नसून खारभूमीचा बंधारा आहे. सदर बंधारा पादचारी म्हणून वापर करु नये असा सूचना फलक बंधाऱ्याच्या ठिकाणी लावण्यात आला आहे.

(२) होय.

(३) व (४) विषयांकित पुल (पाईप बंधारा) हा जिल्हास्तरीय रस्त्यावरील असून त्याठिकाणी पूल बांधण्याचे काम निकष, मंजूर व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

**पुणे येथील नीरा-देवधर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(७२) * २४७५६ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नीरा-देवधर (जि.पुणे) धरणग्रस्तांचे पुनर्वसन झाले नसल्यामुळे प्रकल्पग्रस्तांना प्रकल्पग्रस्त असल्याचे दाखले मिळत नसणे, नविन पुनर्वसन गावठाणात सुविधांचा अभाव असणे, त्यामुळे शेतकरी भूमीहीन होऊन त्यांचे पुनर्वसन झाले नसल्याबाबत प्रकल्पग्रस्तांनी पाटबंधारे विभागाकडे पाठपूरावा करुनही यावर शासनाकडून कोणतीही कार्यवाही होत नसल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मा.जलसंपदा, राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत ५ मुद्दे मार्गी लावण्याच्या निर्णयाला ७ महिने होऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

तथापि, नीरा-देवधर धरणग्रस्त पुनर्वसन संघटनेने मा.मुख्यमंत्री महोदयांना दिलेले निवेदन जलसंपदा विभागास प्राप्त झाले आहे.

(२) व (३) दिनांक २० नोव्हेंबर, २०१५ रोजी अशी बैठक झाली नाही.

तथापि, नीरा-देवघर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत राज्यमंत्री (जलसंपदा) यांनी दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी बैठक घेतली होती. सदर बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या समस्या मार्गी लावण्याच्या दृष्टीने संबधितांस आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईत राष्ट्रीय नाट्य अकादमीचे केंद्र सुरु करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत**

**(७३) * २३५५६ श्री.जयंत पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगीत नाट्यापासून ते हौशी आणि व्यावसायिक रंगभूमिची ऐतिहासिक समृध्द परंपरा असलेल्या राज्यामध्ये प्रतिष्ठीत राष्ट्रीय नाट्य अकादमी (एनएसडी) आपले केंद्र सुरू करण्यासाठी उत्सुक असताना मुंबईत जागा देण्याचा प्रस्ताव मागील ८ वर्षाहून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ११ व १२ व्या वित्त आयोगाने राष्ट्रीय नाट्य अकादमीच्या मुंबई केंद्राला मंजूरी देवूनही जमीन उपलब्ध करून देण्यास विलंब होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू अकादमीचे मुंबई केंद्र विनाविलंब कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर आणि जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडून प्राप्त मुंबई उपनगर जिल्हा अथवा मुंबई शहर जिल्हा या जिल्हयांमध्ये जागा मागणी केल्याचे आढळून आलेले नाही. तसेच राष्ट्रीय नाट्य अकादमीचे मुंबई येथे केंद्र सुरू करण्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून महसूल विभागाकडे प्राप्त झालेला नाही. तसेच शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडे असा कोणताही प्रस्ताव कार्यवाहीत किंवा प्रलंबित नाही.

(२), (३) आणि (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील तलाठी कार्यालयातील ऑनलाईन नोंदी प्रलंबित असल्याबाबत**

**(७४) * २३९८२ श्री.नारायण राणे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मागील वर्षापासून तलाठी कार्यालयाकडील सर्व प्रकारच्या हस्तलिखित नोंदी बंद केल्या असून संगणकीकरण आणि ऑनलाईन व्यवहारांची सक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी कार्यालयाकडील ऑनलाईन धोरणाच्या अंमलबजावणीत क्षेत्रिय कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे अज्ञान तसेच तांत्रिक मार्गदर्शनाच्या प्रशिक्षणाअभावी कामात व्यत्यय येत असून तलाठी कार्यालयाकडील जमिनीची खरेदी-विक्री, सात-बाराचा उतारा, फेरफार अशा व्यवहारांच्या सर्वच प्रकारच्या नोंदीचे काम वर्षभरापासून प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत राज्याच्या जमाबंदी कार्यालयाने राज्यातील तलाठी नोंदीचे काम जिल्हानिहाय सम आणि विषम तारखांना घेण्याचे ठरविले असून राज्यातील १२ हजार तलाठ्यापैकी केवळ ४५० ते ५०० तलाठी एकावेळी लॉगीन करु शकत असल्याने तलाठी कार्यालयातील कामे विहित मुदतीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), व (३) गा.न.नं. ७/१२ संगणकीकृत होऊन त्यातील नोंदी ऑनलाईन अद्ययावत करण्याच्या उद्दीष्टाने “ई-फेरफार” कार्यक्रम राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक २३ जानेवारी, २०१३ रोजी घेतला आहे. त्याअनुषंगाने जिवती तालुका वगळता सर्व ३५७ तालुक्यांतील गा.न.नं. ७/१२ चा संगणकीकृत डाटा “स्टेट डाटा सेंटर” वर अपलोड करण्यात आला असून या सर्व तालुक्यातील हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ मध्ये नोंदी घेण्याचे बंद करण्यात आले आहे. संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील डाटा एन्ट्री किंवा डाटा कन्व्हर्जनच्या चुका दुरुस्त करण्यासाठी तलाठ्यांना “एडीट मोड्युल” उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्याचबरोबर ऑनलाईन डाटा अपडेशन व ई-फेरफारचे कामही सुरु आहे. एडिट मोड्युलच्या वापराकरीता सर्व तलाठी / मंडळ अधिकारी यांना याबाबतचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच अडचणींचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी (तांत्रिक मार्गदर्शन) यांच्यासह निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली हेल्प डेस्क ची स्थापना करण्यात आली आहे.

संपुर्ण राज्यातुन वापरकर्ते एकाच वेळी लॉगीन करीत असल्याने डाटा बेस सर्व्हरवर येणारा ताण विभागण्यासाठी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, पुणे यांचेकडून दिनांक १ ऑक्टोबर, २०१६ पासुन राज्यात ई-फेरफार आज्ञावली वापरासाठी वेळापत्रक लागु करण्यात आले होते. तथापी दिनांक

१४ ऑक्टोबर, २०१६ रोजी ६ महसुल विभागासाठी स्वतंत्र डाटा सर्व्हर व प्रत्येक जिल्हयाकरीता स्वतंत्र वेब सर्व्हर उपलब्ध झाले आहेत. नवीन डाटा सर्व्हरवर विभागनिहाय जिल्हयांचा डाटा अपलोड करण्याचे काम राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांचेतर्फे सुरु असुन दिनांक २२ नोव्हेंबर, २०१६ पर्यंत पुणे, नागपूर, औरंगाबाद, सोलापूर व सांगली या ५ जिल्हयांचा डाटा अपलोड करण्याची कार्यवाही पुर्ण झाली असुन नागपुर व औरंगाबाद या दोन जिल्हयांसाठी सम / विषम वेळापत्रक रद्द करण्यात आले आहे. यापुढे ज्या जिल्हयांचा डाटा नवीन डाटा सर्व्हरवर अपलोड करण्यात येईल त्यांचा अहवाल प्राप्त होताच सम / विषम वेळापत्रक सदर जिल्हयांसाठी रद्द करण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी कृषि योजनांच्या प्रस्तावाबाबत**

**(७५) * २४११५ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये सन २०१६-२०१७ हे वर्ष "शेतकरी स्वाभिमान वर्ष" म्हणून मा.वित्त मंत्री यांनी जाहीर केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकरी स्वाभिमान वर्ष म्हणून नेहमीच्या योजना वगळता इतर कोणत्या नाविन्यपूर्ण व वैशिष्ट्यपुर्ण योजना या वर्षात राबविण्यात आल्या वा येत आहेत,
(३) असल्यास, या नाविन्यपूर्ण व वैशिष्टपूण योजनेसाठी आर्थिक तरतुद करण्यात आली आहे काय, तसेच या योजनांसाठी केलेली आर्थिक तरतूद व आतापर्यंत झालेल्या प्रतिपुर्तीची नेमकी सद्यस्थिती काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) होय.
(२) सन २०१६-१७ वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना शासनाने खालील नवीन १००% राज्य योजना घोषित केल्या आहेत.

(१) पंडीत दीनदयाळ उपाध्याय कृषि मार्गदर्शक योजना
(२) कृषि गुरुकुल योजना

(३) कृषि महोत्सव योजना

(४) राज्य कृषि व अन्न प्रक्रिया योजना

(५) सेंद्रीय शेती संशोधन व प्रशिक्षण केंद्र

(६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना

(३) व (४) सन २०१६-२०१७ या चालू आर्थिक वर्षात प्रस्तावित १००% राज्य योजनांसाठी नियोजन विभागाने एकूण रूपये १५० कोटी एवढा नियतव्यय उपलब्ध करून दिला आहे. वरील नमूद नवीन योजनांचे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून सदर योजनांचे प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहेत. त्यामुळे सद्य:स्थितीत या योजनांसाठी करण्यात आलेल्या तरतुदी खर्च करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वणी व आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(७६) * २४७०३ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी व आर्णी (जि.यवतमाळ) तालुक्यात माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१६ मध्ये परतीच्या पावसामुळे कापूस, सोयाबीन, तूर या पिकांचे नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुसार शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अतिवृष्टीमुळे शेतीपिकांची नुकसान भरपाई देण्यासाठी, झालेल्या नुकसानीची आकडेवारी क्षेत्रिय कार्यालयांकडून अचूक पंचनामे करून मागविण्यात आली आहे. सदर माहिती संकलित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहितीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत देण्याबाबतचा निर्णय घेण्याची बाब प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील संपूर्ण टोलवसुली व इंधन उपकर बंद करण्याबाबत

**(७७) * २४३३९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक २०८६३ ला दिनांक २२ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईत रस्ते विकास मंडळाने १०६५.२५ कोटी रुपये खर्चून ३८ उड्डाणपुल बांधले असून सदरील खर्च वसूल करण्यासाठी टोल, जाहिराती आणि इंधनावर उपकाराच्या पेट्रोलवर १ टक्का आणि डिझेलवर ३ टक्का आकारुन खर्च वसूल करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९९९-२००० पासून सुरु झालेल्या या टोलवसुलीतून ठेकेदाराला ऑक्टोबर, २०१० मध्ये रुपये १०५८.६६ कोटी वसूल झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईत इंधनावर आकारण्यात येणाऱ्या उपकराच्या माध्यमातून राज्य शासनाने रुपये ८२२ कोटींची वसूली केल्याचे निदर्शनास आल्याने उड्डाणपूल बांधणी खर्च आधीच वसूल झाल्याने हा उपकर कर बंद करण्याची शिफारस भारताचे नियंत्रक आणि महालेखपरीक्षक (कॅग) यांनी शासनाला केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई शहराच्या प्रवेशद्वारावरील पाच टोल व पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवेवरील पाच टोलनाक्यासह राज्यातील संपूर्ण टोल वसुली बंद करण्यासंदर्भात नेमलेल्या समितीने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनास अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, अहवालानुसार मुंबई शहराच्या प्रवेशद्वारावरील पाच टोल व पुणे-मुंबई एक्सप्रेस हायवेवरील पाच टोलनाक्यासह राज्यातील संपूर्ण टोलवसुली व इंधन उपकर बंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय.

मुंबई, उपनगरे, ठाणे व नवी मुंबई परिसरात बांधण्यात आलेल्या उड्डाणपूल व इतर कामांवर एकूण रुपये १२५८.९९ कोटी इतका खर्च झालेला आहे. पथकरातील तूट भरून काढण्यासाठी मुंबई, ठाणे व नवी मुंबई परिसरातील पेट्रोलवर १ टक्का व डिझेलवर ३ टक्के उपकर लावण्यात आला आहे.

(२) नाही. पथकरातून ऑक्टोंबर, २०१० पर्यंत महामंडळास रुपये १०६९.२८ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे. तद्नंतर सिक्युरीटायझेशन पध्दतीने रुपये २१०० कोटी एवढे एकरकमी अग्रिम घेऊन उद्योजकास दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ पर्यंत पथकर वसूलीचे कंत्राट देण्यात आले आहे.

(३) होय.

(४) मुंबई शहराच्या प्रवेशव्दारावरील पाच टोल व पुणे मुंबई एक्सप्रेस हायवेवरील टोलनाक्यांबाबत नेमलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईतील इंधनावरील उपकरासंदर्भात महामंडळाचा स्पष्टीकरणात्मक अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यानुसार मुंबई प्रवेशद्वार व मुंबई-पुणे एक्सप्रेस वे प्रकल्पावरील खर्चाची वसुली अद्याप बाकी असल्याने इंधन उपकर सुरु ठेवणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानेगांव (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) येथील शेतीच्या संदर्भात महसूल विभागात झालेला गैरव्यवहार

**(७८) * २५७५१ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानेगांव (ता.जळगांव-जामोद, जि.बुलढाणा) येथील गट क्र. ३६, ३५२, ३५३, ३५९ या खाजगी शेतीच्या संदर्भात महसूल विभागात गैरव्यवहार झाल्याबाबत दिनांक ६ फेब्रुवारी, २०१२ रोजीच्या अपिल अर्जाच्या तक्रारीवरून महसूल व वन विभाग (मंत्रालय) यांच्या आदेशानुसार विभागीय आयुक्त, अमरावती यांनी ३ सदस्यीय चौकशी समितीची नियुक्ती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयाचे अप्पर जिल्हाधिकारी तथा समितीचे अध्यक्ष यांच्या ३ सदस्यीय चौकशी समितीने दिनांक १४ जून, २०१२ रोजी शासनास सादर केलेल्या चुकीचा अहवालावर महसूल विभागाच्या निवृत्त सचिवामार्फत उच्चस्तरीय चौकशी होण्याबाबत अखिल भारतीय लोकतंत्र सेनानी संघ (जि.बुलढाणा) यांनी मा.महसूल मंत्री तसेच मा.पालकमंत्री, बुलढाणा यांच्याकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३ सदस्यीय चौकशी समितीची निवृत्त झालेल्या महसूल विभागाच्या सचिवामार्फत उच्चस्तरीय चौकशी होण्याबाबत तसेच चौकशी अहवालानुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) या प्रकरणी दिनांक १ डिसेंबर, २०१२ रोजीच्या प्राप्त झालेल्या एका तक्रारदाराच्या निवदेनाच्या अनुषंगाने तत्कालीन विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या दिनांक १८ डिसेंबर, २०१२ च्या पत्रान्वये अप्पर जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.

(२) होय.

(३) व (४) अखिल भारतीय लोकतंत्र सेनानी संघ (जि.बुलढाणा) यांनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक १९ सप्टेंबर, २०१३ रोजी सादर केलेले निवेदन शासनास प्राप्त झाले असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचे कार्यालयाकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

-----------------

**परभणी जिल्हयातील गोरक्षणाची जमीन शासनाच्या ताब्यात देणेबाबत**

**(७९) * २४४८७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील गोरक्षणाची जमीन शासकीय वापरासाठी जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात द्यावी अशी मागणी जिल्हाधिकारी, परभणी यांनी सन २०१५-२०१६ यादरम्यान प्रधान सचिव, उद्योग यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून प्रस्तावीत विविध विकास कामांसाठी लागणारी गोरक्षणाची जमीन शासकीय वापरासाठी जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) होय, शासन निर्णय, वित्त विभाग क्र.शासाउ-१०.०५/प्र.क्र.१२/सा.उ., दिनांक ३० जानेवारी, २००६ नुसार परिसमापित करावयाच्या महामंडळाच्या मालमत्तेची विक्री करणे संदर्भात मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीसमोर मराठवाडा विकास महामंडळाची उपकंपनी परभणी कृषि गोसंवर्धन मर्यादितकडे ताब्यात असलेल्या जमिनी संदर्भात दिनांक ९ नोव्हेंबर, २०१५ रोजी वित्त विभागामार्फत सादरीकरण करण्यात आले. समितीने प्रस्तुत प्रकरणी महसूल व वन विभागाचे अभिप्राय प्राप्त करून घ्यावेत अशा सूचना दिल्या. त्यानुसार महसूल व वन विभागाचे अभिप्राय दिनांक २४ ऑक्टोबर, २०१६ रोजी प्राप्त झाले असून प्रस्तुत जमिनी शासनामार्फत प्रदान केलेली नसून मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित अंतर्गत दुय्यम कंपनी परभणी कृषि गोसंवर्धन मर्यादित यांनी खाजगी स्वरूपात संपादित केल्याचे खासरा पाहणी पथक व उपलब्ध अभिलेख्यावरून दिसून आले. त्यानुसार महसूल व वन विभागाचे अभिप्राय वित्त विभागास पाठविण्यात आले आहेत. प्रस्तुत प्रकरण पुन: उच्चाधिकार समिती समोर निर्णयार्थ ठेवणे संदर्भात वित्त विभागास विनंती करण्यात आली आहे.

दरम्यान मंगळवार, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत परभणी जिल्हयातील ब्राम्हणगांव येथील मराठवाडा विकास महामंडळाची ६८ एकर जमीन टेक्सटाईल पार्कसाठी MIDC कडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय झाला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे धोंडराई ते सावळेश्वर (ता.गेवराई, जि.बीड) ग्रामीण रस्ता पूर्ववत सुरु करणेबाबत

**(८०) * २३४८५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धोंडराई ते सावळेश्वर (ता.गेवराई, जि.बीड) ग्रामीण रस्ता क्र.१३७ या रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे हा रस्ता रहदारीसाठी बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे धोंडराई, (ता.गेवराई) येथील ग्रामस्थ महिलांनी सदर रस्ता रहदारीसाठी खुला करून त्याची दुरुस्ती करण्याच्या मागणीसाठी दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, गेवराई यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार मौजे धोंडराई ते सावळेश्वर रस्ता पूर्ववत सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दिनांक २६ सप्टेंबर, २०१६ रोजी धोंडराई येथील ग्रामस्थ जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, गेवराई या कार्यालयासमोर उपोषणास बसले असता त्याच दिवशी तहसिलदार, उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, गेवराई व पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे, गेवराई यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून उपोषण सोडविले.

(३) व (४) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. धोंडराई ते सावळेश्वर रस्ता पुर्ववत सुरू करण्याच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेस योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

-----------------

**सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(८१) * २३७७३ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील भात पिकांवर करपा रोगाची लागण होवून भात शेतीचे नुकसान झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार भात शेतीधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) भात पिकावर भुंगेर या किडीचा व करपा रोगाचा प्रादुर्भाव झाल्याचे आढळून आले होते.

किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पांतर्गत (क्रॉपसॅप) शेतकऱ्यांना एसएमएस, वर्तमानपत्रात प्रसिध्दी, लिफलेट व पॉम्पलेटव्दारे तसेच प्रत्यक्ष शेतावर भेटीच्यावेळी किड नियंत्रणाकरिता उपाययोजना सुचविण्यात आल्या. त्याचप्रमाणे मोनोक्रोटोफॉस सायपरमेश्रीन व कार्बनडेंझिमचा पुरवठा अनुक्रमे १५ लि., ८० कि.ग्रॅ. व ६० लि. करण्यात येवून वेळीच किड रोगाचे नियंत्रण करण्यात आले. १०० टक्के क्षेत्र उपचारित करण्यात आले आहे.

पीक कापणी प्रयोगाच्या आधारे तालुक्यात भात पिकाची उत्पादकता ५३५० कि.ग्रॅ. प्रति हेक्टर एवढी आली असून उत्पादन चांगले आले आहे. किड/रोगामुळे उत्पन्नात घट झालेली नाही. त्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.